www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक

# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ



■ लांब पल्ल्याच्या गाड्यांना भाईंदरमध्ये थांबा मिळणार

पान ३ वर....



■ जामिनासाठी शिल्पकार आपटेची उच्च न्यायालयात धाव

पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १६५ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, बुधवार, १३ नोव्हेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## महाराष्ट्र में फिर एक बार, महायुती सरकार! पुण्यात पंतप्रधान मोदींचा नाराऽऽऽ

● मुंबई, विशाल कारंडे :

राज्यात महायुतीसाठी भाजप आणि वरिष्ठ नेत्यांचा प्रचारसभांचा धुरळा उडवला आहे. पुण्यातील सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महायुतीची सरकार येणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. पुण्यात गुंतवणूक, इन्फ्रास्ट्रक्चर याची गरज आहे. ती आम्ही वाढवू. मी तुम्हाला भरवसा देतो, महायुतीचं नवीन सरकार आणखी वेगानं पुण्याच्या विकासासाठी काम करेल, अशी ग्वाही देताना पंतप्रधान मोदींनी पुण्यात महाराष्ट्र में फीर एक बार, महायुती सरकारचा नारा दिला.



विधानसभा निवडणुकीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी चांगलीच कंबर कसली आहे. एकीकडे अमित शहा यांनी राज्यातील काही भागात सभांचा घडाका लावला आहे. तर दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून सभा घेण्यात येत आहे. मंगळवारी (१२ नोव्हें.) पंतप्रधान मोदींची पुण्यात सभा झाली. या सभेत पंतप्रधान त्यांच्या स्वत:चा आईचा फोटो पाहून भावुक झाल्याचे पाहायला मिळाले. मी छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांना नमन करतो. अष्टविनायकाला नमन करतो. मी पुण्यातील लाडक्या बहीणी आणि लाडक्या भावांना नमन करतो. मी पाहतोय कोणी सज्जन माझ्या आईची प्रतिमा घेऊन आले आहेत. तुमचे हे प्रेम माझ्यासाठी मोठी ठेव आहे. कोणीतरी ती प्रतिमा घ्या. त्यावर तुमचं नाव पत्ता लिहा. मी तुम्हाला पत्र लिहणार आहे. रत्या-रस्त्याने मोठ्या संख्येने लोक उपस्थित होते. महाराष्ट्रात पुन्हा एकदा महायुती सरकार येईल. तुमचे प्रेम हे सांगत आहे.मी तुम्हाला विश्वास देतो की महायुतीचं नवीन सरकार आणखी वेगानं पुण्याच्या विकासासाठी काम करेल.

पुण्यात गुंतवणूक, इन्फ्रास्ट्रक्चर याची गरज आहे. ती आम्ही वाढवू पुण्यात मेट्रोचा सातत्याने विस्तार होत आहे. स्वारगेट- कात्रज सेक्शनमध्ये मेट्रोचं काम वेगाने पुढं जात आहे. इन्ट्रासिटी आणि इंटरसिटी कनेक्टिविटीसाठी प्रयत्न करत आहेत. आज कार्तिकी एकादशी आहे. आम्ही पालखी मार्ग केले आहेत. ही आमची वारकऱ्यांसाठी समर्पित सेवा आहे. आधीच्या आघाडी सरकारकडे तुम्हाला सांगण्यासारखे काही नाही. त्यांचे अडीच वर्ष आमच्यावर आरोप करण्यातच गेले. महायुती आहे, तर महाराष्ट्रात विकासाला गती आहे.

## निवडणूक विशेष पोलीस निरीक्षकांनी घेतला कोकण विभागातील निवडणूक तयारीचा आढावा

● ठाणे, यश सावंत :

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठीची मतदान प्रक्रिया २० नोव्हेंबर २०२४ रोजी होणार आहे. या पार्श्वभूमीवर कोकण विभागातंर्गत येणाऱ्या सर्व जिल्ह्यांच्या तयारीचा आढावा मंगळवारी निवडणूक विशेष पोलीस निरीक्षक दीपक मिश्रा यांनी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित केलेल्या बैठकीदरम्यान घेतला. निवडणूकीचे काम हे राष्ट्रीय कर्तव्य असून या कर्तव्यात कोणतीही कसूर राहणार नाही. या दृष्टीने विधानसभा सार्वत्रिक निवडणूका शांततेत व सुरळीत पार पडण्यासाठी ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या सर्व जिल्ह्यातील जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी, पोलीस प्रशासन यांनी सतर्क राहण्याचे आदेश देत आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना बैठकीत दिल्या.

मंगळवारी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात निवडणूक विशेष पोलीस निरीक्षक यांनी कोकण



विभागातील सर्व जिल्ह्यांतील निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला. यावेळी पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग येथील जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी हे दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते. सुरूवातीला ठाणे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी ठाणे जिल्हयातील १८ विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रे, मतदानाची तयारी याबाबत सादरीकरणाच्या माध्यमातून माहिती दिली. तसेच कोकण विभागातंर्गत इतर जिल्ह्याबाबतही त्यांनी जाणून घेतले. पान २ वर

## प्रलंबित बिलाच्या मंजुरीसाठी २० हजारांची लाच स्वीकारणाऱ्या कार्यकारी अभियंत्यासह शिपायास अटक



● ठाणे, रोहित जैसवार :

पाणी पुरवठा विभागातील जलजीवन मिशन योजनेतील प्रलंबित बिलातील रक्कमेच्या अडीच टक्के प्रमाणे ४५ हजारांच्या लाचेची मागणी करुन २० हजारांची लाच स्वीकारणाऱ्या कार्यकारी अभियंता विकास जाधव आणि शिपाई चेतन देसले या दोघांना ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक (एसीबी) विभागाने रंगेहाथ अटक केल्याची माहिती मंगळवारी दिली. या दोघांविरुद्ध ठाणेनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

ठाणे जिल्हा परिषदेतील ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील जलजीवन मिशन योजनेतील प्रलंबित बिलातील अडीच टक्के प्रमाणे ४५ हजारांच्या लाचेची मागणी तक्रारदार यांच्याकडे केली होती. त्याबाबत तक्रारदार यांनी ठाणे एसीबीकडे ७ नोव्हेंबर २०२४ रोजी तक्रार केली होती. याबाबत त्यांनी ठाणे एसीबीकडे दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने ८ नोव्हेंबर रोजी पडताळणी करण्यात आली. याच कारवाई दरम्यान जाधव यांनी बिलातील शासकिय शुल्क कपात करून उर्वरीत बिलाच्या रक्कमेच्या अडीच टक्के प्रमाणे २७ हजारांच्या लाचेची मागणी केली.

तडजोडअंती २० हजार रुपये स्वीकारण्याचे मान्य केले. पान २ वर

## महाडमधील प्रदूषणप्रकरणी १०६ कंपन्यांना नोटीस; एमपीसीबी महाड विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली माहिती

● रायगड, भावना जैन :

मागील सुमारे एक महिन्यापासून सावित्री नदीपात्रामध्ये झालेल्या मुसळधार पावसाचा फायदा घेत काही कंपन्यांकडून रासायन नदीपात्रात सोडण्यात आले होते. यामुळे टेमघर नाल्यासह परिसरातील अनेक ठिकाणी परिसरातील पाण्याची ठिकाणे रंगीत झाल्याच्या तक्रारी स्थानिक जनतेकडून करण्यात आल्या. यासंदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे महाड विभागाचे ठाकरे यांना



भ्रमणध्वनीद्वारे विचारणा केली असता त्यांनी सावित्री बचाव समितीच्या वतीने या संदर्भात करण्यात आलेल्या तक्रारीची दखल घेऊन प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी याबाबत केलेल्या पाहणीनंतर महाड वसाहती मधील १०६ कंपन्यांना या संदर्भात वार्निंग नोटिसा बजाविल्याची माहिती दिली तसेच तीन कंपन्या त्यामध्ये श्रीहरी सुदर्शन व एजी कंपनीचा समावेश आहे. या संबंधित तीनही कंपन्यांच्या विरोधात प्रत्यक्ष कारवाई सुरू केल्याचे निदर्शनास आणले. त्यांना देण्यात आलेल्या नोटिसीसंदर्भात त्यांच्याकडून अहवाल मागविण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

सावित्री बचाव समिती व संबंधित नागरिकांकडून करण्यात आलेल्या या तक्रारीची गंभीर दखल घेऊन महाड उत्पादक संघटन चालविण्यात येणाऱ्या सीटीपीमध्येही याबाबत आपण चर्चा केल्याची माहिती दिली. या ठिकाणी लॉक अँड की सिस्टीम कार्यान्वित असून या ठिकाणी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशानुसार पूर्तता झाली असल्यासच येथून डिस्चार्जची परवानगी दिली जाते असे त्यांनी सांगितले. ऑनलाइन पद्धतीने सर्व संबंधित कंपन्यांचे सीओडी व बीओडी आता उपलब्ध होऊ शकतात असे त्यांनी सांगितले. पान २ वर

## सलग दुसऱ्या दिवशीही उद्धव ठाकरे यांच्या बॅगांची निवडणूक अधिकाऱ्यांनी केली तपासणी

● लातूर, नितीन देवळेकर

यवतमाळ येथील सभेआधी सोमवारी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या बॅगा निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी तपासल्या. त्यानंतर मंगळवारी सलग दुसऱ्या दिवशी लातूरमधील औसा येथील सभेआधी देखील उद्धव ठाकरे यांच्या बॅगा तपासण्यात आल्या आहेत. या घटनेचा व्हिडीओ देखील उद्धव ठाकरे यांनी शूट केला असून त्यात निवडणूक अधिकाऱ्यांनी स्वत: उद्धव ठाकरे हे पहिलेच आहेत ज्यांच्या ते बॅगा तपासत असल्याची कबूली दिली आहे. त्यावरून निवडणूक आयोग आकसवृत्तीने या कारवाया करत असल्याची प्रतिक्रीया व संताप व्यक्त केला जात आहे.

औसा येथील हेलिपॅडवर उद्धव ठाकरे यांचे हेलिकॉप्टर उतरताच तेथे निवडणूक आयोगाचे अधिकारी उपस्थित होते. त्यांनी उद्धव ठाकरे यांच्या



बॅगा तपासल्या. यावेळी उद्धव ठाकरे यांनी बॅग तपासणीचा व्हिडीओ शूट केला. त्यांनी सुरुवातीला सर्व निवडणूक अधिकाऱ्यांची माहिती घेतली. यावेळी उद्धव ठाकरे यांनी निवडणूक अधिकाऱ्यांनी आतापर्यंत किती जणांच्या बॅगा तपासल्या असे विचारले. त्यावेळी अधिकाऱ्यांनी उद्धव ठाकरे हे पहिलेच असल्याचे सांगितले. त्यावेळी उद्धव ठाकरे यांनी "दरवेळेला मीच पहिला गिऱ्हाईक मिळतो का? आज मोदी येतायत. मोदींकडे पाठवतो तुम्हाला. आज मोदींची तपासणी झालीच पाहिजे ही माझी जाहीर सभेत मागणी असेल", असे उद्धव ठाकरे म्हणाले.


यावेळी उद्धव ठाकरे यांनी निवडणूक अधिकाऱ्यांना माझा तुमच्यावर राग नसल्याचे सांगितले. पान २ वर

## पिंपरी चिंचवड महापालिकेचे अधिकारी-कर्मचारी 'इलेक्शन ड्युटी'वर; नागरिकांच्या कामांचा खोळंबा

● पुणे, अभिजित येरल्लू :

विधानसभा निवडणूक कामासाठी महापालिकेच्या तब्बल ५ हजार अधिकारी व कर्मचार्यांना नेमले आहे. अधिकारी व कर्मचारी हे इलेक्शन ड्युटीत व्यस्त असल्याने महापालिका व क्षेत्रीय कार्यालये ओस पडली असून, दैनंदिन कामकाज ठप्प झाले आहे. त्यामुळे नागरिकांच्या कामाचा खोळंबा होत असल्याने त्यांच्याकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होण्यापूर्वी पुणे विभागीय कार्यालयाने निवडणूक कामासाठी महापालिकेच्या संभाव्य अधिकारी व कर्मचार्यांच्या याद्या तयार केल्या होत्या. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर तात्काळ संबंधितांना कामकाजाच्या ठिकाणी नेमणूक देण्यात



आली. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासोबत सहायक निवडणूक अधिकारी, झोनल ऑफीसर व कर्मचार्यांच्या नियुक्त्या करण्यात आला आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात काही अधिकारी व कर्मचारी तैनात आहेत. मतदान केंद्रावर लागणार्या साहित्याची तयारी सुरू आहे. ईव्हीएम, बॅलेट युनिट, व्हीव्हीपॅट मशिनची ने-आण देखभाल तसेच, विविध पथके तसेच, कामकाजासाठी कर्मचारी नेमले आहेत. पान २ वर

## नाशिकमध्ये मुस्लीम बांधवांचा पक्षाला पाठिंबा न देता मनसेच्या उमेदवाराला पाठिंबा केला जाहीर

● नाशिक, सचिन कदम :

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ ची रणधुमाळी सुरु झाली आहे. राज्यात एकाच टप्प्यात निवडणूक पार पडणार असून २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. तर २३ नोव्हेंबरला निवडणुकीचा निकाल लागणार आहे. एकीकडे महायुती विरुद्ध महाविकास आघाडी लढत होत आहे. तर दुसरीकडे राज ठाकरेंच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने एकला चलो रे चा नारा दिलाय. त्यातच आता नाशिकमध्ये मुस्लीम बांधवांनी मनसे पक्षाला पाठिंबा न देता मनसेच्या उमेदवाराला पाठिंबा जाहीर केलाय. यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.



नाशिक पश्चिम विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीकडून शिवसेना ठाकरे गटाचे सुधाकर बडगुजर यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. तर महायुतीतून भाजपने विद्यमान आमदार सीमा हिरे यांना पुन्हा एकदा संधी दिली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने दिनकर पाटील यांना उमेदवारी दिली आहे. पान २ वर

## "कडवट हिंदुत्ववादीपासून मुसलमानांसमोर लाचार होईपर्यंत."; राज ठाकरेंची उद्धव ठाकरेंवर कडवट टीका

● मुंबई, राकेश गायकवाड :

राज्याच्या विधासभा निवडणुकीसाठी आता काहीच दिवस शिल्लक राहिले आहेत , त्यामुळे आता प्रत्येक राजकीय पक्ष आपल्या प्रचारसभा मोठ्या प्रमाणात घेत आहेत. यंदाच्या निवडणुकीत अनेक पक्ष एकमेकांच्या विरोधात उभे असल्याचे दिसत आहे. यामध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचाही समावेश आहे. माझ्याशिवाय महायुतीचे सरकार बसणार नाही असे मनसे पक्ष प्रमुख राज



ठाकरेंनी सांगितलं आहे आहे. दरम्यान, दिंडोशी याठिकाणी आयोजित एका प्रचारसभेत राज ठाकरेंनी उद्धव ठाकरेंवर कडाडून टीका केली.

दिंडोशीतील सभेत बोलताना राज ठाकरे यांनी,"निवडणूक सभांचा प्रचार करणं कंटाळवाणं असतं. आता टीव्हीवर लाइव्हही दाखवतात. तेच तेच बोलावं लागतं. किती गोष्टी तुम्ही ऐकल्या मला माहीत नाही. पण तेच तेच विषय बोलावे लागतात असेही राज ठाकरे यांनी यावेळी म्हटले. एवढेच नाही तर त्यांनी शिवसेना या पक्षातल्या फुटीवर त्यांनी भाष्य केले.

पुढे बोलताना राज ठाकरे यांनी," मागच्या पाच वर्षांतला सगळा गोंधळ तुम्ही पाहिला आहे. काय गोष्टी घडल्या? कोण कुणाबरोबर गेलं? तुम्हाला माहीत आहे. कुठपर्यंत गेलं प्रकरण? हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना ती आज एकनाथ शिंदेंकडे गेली. निवडणूक चिन्हासकट ती शिवसेना गेली. मला अजूनही आठवतंय मराठवाड्यात एक घोषणा होती. बाण हवा की खान? दुर्दैव असं की उद्धव ठाकरेंकडून बाण निघून गेलाय. उरलेत फक्त खान. वर्सोव्यात उमेदवार कोण दिलाय? हारुन खान. हा शिवसेनेचा उमेदवार आहे. ज्याच्या नावात हारुन आहे तो विजयी कसा होईल?" असा प्रश्न विचारत राज ठाकरेंनी उद्धव ठाकरेंवर बोचरी टीका केली. पान २ वर

**संपादकीय** संपादक - राकेश शंकर गोरे

## न्या. चंद्रचूड यांची कारकीर्द पूर्णत्वाचा प्रामाणिक ध्यास घेणारी

ज्या देशात प्रलंबित वा न्यायप्रविष्ट प्रकरणांची संख्या लाखाच्या घरात आहे त्या देशात एखादा सरन्यायाधीश निवृत्त होताना त्याने दिलेल्या निकालांपेक्षा न दिलेल्या निकालांचीच संख्या अधिक असणार हे स्पष्ट आहे. तरीही सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांची निवृत्ती अनेक अर्थांनी- त्यांनी दिलेल्या तसेच न दिलेल्याही- निकालांचा विचार करताना महत्त्वाची ठरते. त्यावर भाष्य करण्याआधी न्या. चंद्रचूड सरन्यायाधीश झाले ती पार्श्वभूमी लक्षात घ्यायला हवी. दांडग्या बहुमताने सत्तेवर आलेले सरकार सामाजिक बहुमतवादाचा पुरस्कार करत असताना, लोकशाहीतील तीन स्तंभांपैकी प्रशासनाचा स्तंभ अधिकाधिक बळकट होत असताना, सरकारी आणि घटनात्मक यंत्रणा एकापाठोपाठ एक नांग्या टाकत असताना आणि या सगळ्यामुळे नागरिकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास मोठ्या प्रमाणावर डळमळीत होत असताना न्या. चंद्रचूड सरन्यायाधीश बनले. ज्या समाजात समानता हे तत्त्व नैसर्गिक नाही त्या समाजात सामाजिक, लैंगिक समानतेचा आदर करणारी व्यक्ती सरन्यायाधीश होणे आश्वासक होते. आणि म्हणून आपल्या निवाड्यांतून हा समानतेचा आग्रह ते कितपत राबवू शकतात हे पाहणे कुतूहलाचे ठरणार होते. न्या. चंद्रचूड यांच्याआधी एन व्ही रमण्णा आणि मराठमोळे उदय लळित यांच्या काळात सरन्यायाधीश काय करू शकतात याची चुणूक दिसली होती आणि त्यामुळेही न्या. चंद्रचूड यांच्याबाबतचा आशावाद अधिक प्रबळ होता. भारतीय संस्कृतीइतकीच पाश्चात्त्यांची उच्च सांस्कृतिक मूल्ये अंगी बाणलेली, उदारमतवादाचा आणि विविधतेतील एकतेचा सक्रिय पुरस्कार करणारी व्यक्ती सर्वोच्च न्यायिक अधिकारपदी आरूढ होते ही बाब आशा जागवणारी होती. हा आशावाद किती सार्थ, किती अनाठायी ठरला याचा हिशेब त्यांच्या निवृत्तीसमयी मांडणे आवश्यक ठरते. तसा तो मांडत असताना एक वास्तविकता विसरून चालणार नाही. ते म्हणजे आपल्यासारख्या व्यक्तिकेंद्री देशात एकच एकास नायकपद देऊन त्याने सर्वांच्या सर्व अपेक्षा पूर्ण कराव्या असे मानणे हा बालिशपणा ठरेल. तो टाळून न्या. चंद्रचूड यांच्या कार्यसिद्धीचा हा हिशेब.

न्या. चंद्रचूड यांना सरन्यायाधीशपदी दोन वर्षे मिळाली. ही बाब दुर्मीळ. या आधी इतका कालावधी न्या. सरोश होमी कपाडिया यांना मिळाला. ते २०१० ते २०१२ या काळात सरन्यायाधीश होते. त्या काळात न्या. कपाडिया यांनी स्वत: २७ प्रकरणी निकाल लेखन केले. न्या. चंद्रचूड यांनी लिहिलेल्या न्यायादेशांची संख्या ९२ आहे. चंद्रचूड यांच्याआधीच्या चार सरन्यायाधीशांनी दिलेल्या निकालांची बेरीज जरी केली तरी तीपेक्षा न्या. चंद्रचूड यांच्या निकालांची संख्या अधिक भरेल. 'लोकसत्ता लेक्चर'चे उद्घाटन करताना त्यांनी त्यांच्या काळात सर्वोच्च न्यायालयाकडून झालेल्या एकंदर सुनावण्यांचा तपशील दिला. ती संख्या लाखापेक्षा अधिक आहे. यावरून त्यांच्या 'कार्यव्यसनाधीनतेचा' (वर्कोहोलिक) परिचय होईल. ही झाली केवळ संख्यात्मक बाब. न्या. चंद्रचूड यांनी निकालात काढलेले अनेक प्रकरणे ही अर्थातच घटनात्मक वा घटनेशी संबंधित आहेत. भारतीय घटना हा चंद्रचूड यांच्या जिव्हाळ्याचा विषय. अन्य कोणत्याही प्रकरणांपेक्षा घटनात्मक प्रकरणे हाताळणे हे अधिक जिकिरीचे आणि आव्हानात्मक. कारण या प्रकरणातील निकाल हा एका अर्थी कायदा बनतो आणि पुढील अनेक पिढ्यांसाठी तो परिणामकारक ठरतो. न्या. चंद्रचूड यांनी दिलेले अनेक निकाल त्यामुळे घटनात्मकता, समानता संघराज्यवाद आणि निधर्मिकता या मुद्द्यावर मैलाचा दगड ठरले. महिलांना मंदिरात प्रवेश देणारा, खनिज आणि औद्योगिक अल्कोहोल उत्पन्नावर राज्यांना अधिकार बहाल करणारा, तुरुंगातील जातप्रथा नष्ट करणारा इत्यादी निकालांचा दाखला देता येईल. हे सर्व विषय तांत्रिक. जनसामान्यांच्या विचारकक्षेबाहेरचे. पण देशात अपेक्षित असलेला 'सहकारी संघराज्यवाद' (कोऑपरेटिव्ह फेडरलिझम) प्रत्यक्षात उतरवण्यासाठी या निकालांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. हे सर्व निर्णय विस्तारवादी केंद्र सरकारच्या विरोधात जाणारे आहेत, ही बाब विशेष उल्लेखनीय. तथापि 'भक्त'संप्रदाय वगळता सर्वसामान्यांस न्या. चंद्रचूड लक्षात राहतील ते निवडणूक रोख्यांबाबतच्या निर्णयासाठी. निकाल म्हणून त्याचे महत्त्व किती हे नव्याने सांगण्याची गरज नाही. परंतु त्याहीपेक्षा महत्त्वाचा आहे या निकालात सरन्यायाधीशांनी दाखवून दिलेला 'पारदर्शकतेतील समानता' हा निकष. सत्तापदी असलेले आणि नसलेले यांची पारदर्शकता भिन्न असू शकत नाही हे या निकालामागील तत्त्व दूरगामी परिणामकारक ठरेल. 'न्यायिक करुणा' हा न्यायालयीन निकालात क्वचित आढळणारा गुणही न्या. चंद्रचूड यांच्या अनेक निकालांतून दिसतो. एका दलित विद्यार्थ्यास अगदी क्षुल्लक कारणाने आयआयटीत नाकारल्या गेलेल्या प्रवेशाचा मुद्दा वा अपंगांबाबतचे त्यांचे निर्णय यातून या करुणेचे दर्शन घडते.

तथापि ही 'करुणा' आमच्याबाबत निर्णय देताना कोठे गायब झाली असा प्रश्न उद्धव ठाकरे यांची शिवसेना वा शरद पवार यांचा राष्ट्रवादी पक्ष न्या. चंद्रचूड यांस विचारतील. तसे करणे अयोग्य ठरणार नाही. विशेषत: विधानसभाध्यक्ष आणि निवडणूक आयोग यांनी या दोन पक्षांसंदर्भात घेतलेले निर्णय कायद्याच्या तत्त्वांस धरून आहेत असे नाही हे दिसत असतानाही न्या. चंद्रचूड यांनी त्याकडे केलेल्या काणाडोळ्याकडे दुर्लक्ष करणे अशक्य. वस्तुत: पक्षाच्या एकसंधतेसाठी 'विधिमंडळ पक्षापेक्षा संघटना महत्त्वाची' हा त्यांनीच घालून दिलेला निकष त्यांच्या समोरच पायदळी तुडवला जात असताना न्या. चंद्रचूड यांनी त्या प्रकरणी निकाल न देणे हे अतर्क्य. तसेच काही 'अनुच्छेद ३७०' बाबतच्या निर्णयाबाबतही म्हणता येईल. विद्यमान सरकारने ते रद्द केले आणि तसे ते करण्याचा सरकारचा प्रशासकीय अधिकारही आहे.

तथापि अयोध्याप्रकरणी निकालाआधी परमेश्वराला साकडे घातले असे म्हणताना वा पंतप्रधानांच्या समवेत कॅमेऱ्यांच्या साक्षीने गणेशारती करतानाही त्यांस या पाश्चात्त्य संस्कृतीने रोखले असते तर अधिक बरे झाले असते. सरन्यायाधीशांसही धर्मपालनाचा अधिकार आहे हे खरे. पण त्याचे असे प्रदर्शन आपल्या अनुकरणीय समाजात कितपत योग्य हा प्रश्न. तसेच सत्ताधीशांस भेटल्यामुळे न्यायिक प्रक्रियेवर काहीही परिणाम होत नाही, हे त्यांचे प्रतिपादन खरे. पण सत्ताधीशांशी संबंधित काही प्रकरणांत नेमकी ही न्यायिक प्रक्रिया कशी काय बुवा लांबते असा प्रश्न सर्वसामान्यांस पडत असल्यास तोही तितकाच खरा. सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्याबाबत तो पडला नसता तर त्यांची कारकीर्द अधिक देदीप्यमान ठरली असती. हे नमूद करताना कोणाही मर्त्य मानवातील अपूर्णता त्याच्या पूर्णत्वाच्या ध्यासास मोहक बनवत असते हे सत्य लक्षात घ्यावे लागेल. ही पूर्णत्वाची ओढ प्रामाणिक हवी. न्या. धनंजय चंद्रचूड यांची ती होती हे त्यांचे कडवे टीकाकारही अमान्य करणार नाहीत. न्यायालयीन कामकाजाचे थेट प्रक्षेपण करण्याच्या त्यांच्या निर्णयातून हीच प्रामाणिकता दिसून येते. रसाळ भाषा, उच्च कोटीची बुद्धिमत्ता आणि लोभस तर्कवाद या त्यांच्या गुणांनी क्वचितच कोणा न्यायाधीशास मिळणारी लोकप्रियता त्यांना मिळाली. त्याचा फायदा न्यायपालिकेस नि:संशय होईल. अन्य काही पूर्वसुरींप्रमाणे निवृत्तीपश्चात त्यांच्या कारकीर्दीवर संशयशिंतोडे उडू नयेत अशीच सप्रेम इच्छा या प्रसंगी अनेकांची असेल.

# इतर वेळेच्या फटाके बाजीवर देखील बंदी घाला

फटाके आणि दिवाळी हे समीकरणच आहे. दरवर्षी दिवाळीत मोठ्या प्रमाणात फटाके वाजवले जातात त्यामुळे वायू प्रदूषण तर होतेच पण त्यासोबतच ध्वनी प्रदुषण देखील होते. फटाक्यांचे केवळ इतकेच दुष्परिणाम आहेत असे नाही तर याशिवायही अनेक दुष्परिणाम फटाक्यांमुळे होतात म्हणूनच दरवर्षी दिवाळी आली की शासकीय यंत्रणा, सामाजिक व सेवाभावी संस्था तसेच पर्यावरणवादी संघटना नागरिकांना दिवाळीत जास्त फटाके वाजवू नका असे आव्हान करतात. फटाकेमुक्त दिवाळी साजरी साजरी व्हावी यासाठी विविध उपक्रम राबवले जातात. शाळा, कॉलेजमधून त्याबाबत जनजागृती केली जाते. फटाक्यांचे दुष्परिणाम समजावून सांगितले जातात आणि ते योग्यही आहे, त्याची गरजही आहे. फटाकेमुक्त दिवाळी साजरी करणे ही काळाचीच गरज आहे. फटाक्यांमुळे अनेक दुष्परिणाम होतात.

सरकारी यंत्रणा, सामाजिक व सेवाभावी संस्था तसेच पर्यावरणवादी संघटनांच्या आव्हानांना आणि प्रयत्नांना बऱ्यापैकी यश ही मिळत आहे. यावर्षी दिवाळीत फटाके वाजले मात्र मागील वर्षीच्या तुलनेत त्याचे प्रमाण कमी होते. फटक्यांबाबत नागरिकांची जनजागृती होतेय ही अतिशय चांगली गोष्ट आहे. फटाक्यांच्या दुष्परिणामाबाबत नागरिक जागरूक होत आहे ही स्वागतार्ह बाब आहे याबाबत सरकारी यंत्रणा, सामाजिक व सेवाभावी संस्था तसेच पर्यावरणवादी संघटनांचे अभिनंदनच करायला हवे तसेच नागरिकांचेही आभार मानावे लागेल. नागरिकांनी दिवाळीत फटक्यांबाबत जी जागरूकता दाखवली ती इतर वेळेसही दाखवायला हवी. कारण आपल्या देशात केवळ दिवाळीतच फटाके वाजवले जातात असे नाही तर वर्षभर कोणत्या ना कोणत्या कारणांनी फटाके वाजवले जातात मग तो सण उत्सव असो की आनंदाचं प्रसंग. फटाके वाजवूनच सण - उत्सव, आनंदाचे क्षण साजरे करण्याची प्रथाच पडली आहे. काही लोक नवीन वर्षाचे स्वागत फटाक्यांच्या आतषबाजीने करतात. ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री कानठळ्या बसतील इतकी फटाके वाजवली जातात. थर्टी फर्स्ट साजरा करताना उन्माद दाखवण्याच्या खटाटोपात नागरिक फटकेबाजी करतात. नाताळच्या रात्रीही फटाके वाजवले जातात. ईदच्या दिवशी चांद दिसला की फटाके वाजवली जातात.

वाढदिवस साजरा करताना फटाके वाजवण्याचे फॅड हल्ली सुरू झाले आहे. लग्नातही फटाक्यांची आतषबाजी पाहायला मिळते. दिवाळीत फटाके वाजवू नका असे आव्हान करणाऱ्या राजकीय नेत्यांच्या राजकीय मेळाव्यात, विजयी मिरवणुकांतही फटाक्यांची मोठ्या प्रमाणात आतषबाजी होते. दिवाळीत जास्त फटाके वाजू नयेत यासाठी प्रयत्न करणारे या इतर वेळी केल्या जाणाऱ्या फटाकेबाजीकडे मात्र सोईस्करपणे दुर्लक्ष करतात.


दिवाळीच्या पाच दिवसांच्या फटाक्यांमुळे जे दुष्परिणाम होतात तेच इतर वेळेच्या फटाकेबाजीतही होतात. त्यामुळे या इतर वेळेच्या फटाक्यांच्या आतषबाजीवर देखील बंधने घातली पाहिजेत. नागरिकांनीही फटाके वाजवूनच आनंद साजरा केला पाहिजे ही मानसिकता बदलायला हवी. नागरिकांनी फटक्यांबाबत जी जागरूकता दिवाळीत दाखवली ती वर्षभर दाखवायला हवी.

**- श्याम ठाणेदार**

# वास्तवाकडे नेणारे 'एक न पटणारे सत्य'

अंतराळ किंवा या ब्रम्हांडातील अनेक गोष्टी आपल्यासाठी सदैव कुतूहल आणि गूढ बनून राहिल्या आहेत. त्यातूनच अनेक सिद्धांत जगभरात वेगवेगळ्या माध्यमातून सांगितले गेले आहे. विश्वाचे रहस्य उलगडण्यासाठी या सर्व अभ्यासातून निर्माण झालेले एक न पटणारे सत्य हे वेगळ्या विषयावरील अभ्यासपूर्ण पुस्तक लिहण्यासाठी त्यांचा लौकिक असलेल्या डॉ. मेहरा श्रींखडे यांचे पुस्तक हे नक्कीच वाचकांचे कुतूहल शमवण्यासाठी सहाय्यभूत ठरेल, असा विश्वास आहे.

अनंत विश्वाचे अंतरंग अद्यापही शास्त्रज्ञांना शोधता आले नाही. हे अंतराळ विश्व सदैव मानवतेसाठी कुतूहल आणि गूढ राहिले आहे. त्याबद्दलच्या अनेक कल्पना आपण ऐकत आलो आहोत. पण त्या सर्वांना एका धाग्याने विणत त्यांचा एक सुंदर गोफ बनवण्याची किमया या नव्या पुस्तकाने साधली आहे. याचे कारण म्हणजे केवळ उडत्या तबकडत्याच नव्हे तर अखिल मानवतेचा पूर्व इतिहास तसेच भविष्याच्या दृष्टीने अनेक गोष्टींचा उलगडा होण्याच्या दिशेने सर्वांना प्रेरित करणारे हे पुस्तक आहे. या लिखाणाला कुठल्याही मर्यादा नाहीत. त्यामुळे संपूर्ण विश्वात या पुस्तकातील विचार वाचकांबरोबर या विषयावर अभ्यास करणाऱ्या सर्वच संशोधकांना त्यांच्या कार्यासाठी प्रेरित करणारे आहे. नव्या विचारांना बळकटी देणारे आहे. भविष्यात जर आपण विश्वाचे रहस्य उलगडू शकलो तर त्यातील प्रारंभीचे अनेक मुद्दे हे डॉ. मेहरा श्रीखंडे यांनी व्यक्त केलेल्या अनेक विचारांशी निगडीत राहिलेले असतील, याचा मला ठाम विश्वास आहे.




अंतराळातील गूढ आणि रहस्यांचा उलगडा करण्यासाठी संशोधकांनी अनेक अभ्यासपूर्ण लेख, प्रबंध लिहिलेले आहेत. त्याचा अभ्यास करताना त्यांनी त्या प्रत्येक विचारांना समजून घेऊन त्यांच्या बिटवीन तर लाईन्स म्हणा किंवा त्यामागे अजून काय दडले आहे, त्यातून नेमका अर्थ काय प्रेरित होत आहे, त्यांनी समजून घेतले आहे. सिरिअस ताऱ्याचे महत्व, युएफओंचा इतिहास, दक्षिण अमेरिकेतील रहस्यमय गोष्टी, क्रॉप सर्कल, झेकेरिया सिचिन यांचा अभ्यास, ओरियनचा उदय, रेंडलेशन फॉरेस्ट, कॅनेरी बेटे, सेटी ही त्यांची या पुस्तकातील काही प्रकरणे वाचली तरी यातून ते समजून घेता येते. या विषयावरील आतापर्यंतच्या पुस्तकाव्यतिरिक्त अनेक पातळयांवर त्यांनी दाखविलेल्या वैविध्यपूर्ण अभ्यासामुळे त्याचे वेगळेपण जपले गेले आहे. त्याला अधिक महत्व प्राप्त झाले आहे. त्यांनी अभ्यासकांना आणि संशोधकांना एक मार्ग दाखवला आहे. त्याच्या अनुषंगाने भविष्यात अनेकांना त्या विषयावर अधिक संशोधन करण्यासाठी गीतेप्रमाणे मार्गदर्शन मिळणार आहे.

साहित्यक्षेत्रात अशा विषयावरील लिखाण तुलनात्मकदृष्ट्या कमी प्रमाणात आढळते. उलट या विषयावर अधिक लिहिले गेले पाहिजे. आपले विचार प्रगट झाले पाहिजेत. नव्या शोधाची दिशा सापडली पाहिजे. त्याचीच जबाबदारी लेखिकेने जाणून त्या अनुषंगाने आपले साहित्यिक कार्य पुढे नेले आहे. मला खात्री आहे की, या साहित्यकृतीचे वाचकांकडून उत्स्फूर्त स्वागत तर होईलच परंतु केवळ इंग्रजी भाषेपुरतेच ही साहित्यकृती न राहता अन्य भाषिकांपर्यंत त्यांच्या भाषेतून पोहचण्याची प्रेरणा मिळेल. नव्या पिढीलादेखील आपल्या अनंत विश्वाच्या स्वरूपाची माहिती मिळेल. आजच्या नव्या पिढीची ज्ञान ग्रहण करण्याची साधने विविध स्वरुपांमध्ये अधिकांश वाढली आहेत. यात समाजमाध्यम, चलचित्र दृश्य स्वरुपातदेखील त्याचे प्रमाण अधिक लोकप्रिय आहे. त्यामुळेच या लिखाणाचा पुढे चलचित्र स्वरुपात अथवा समाजमाध्यमातून विविध प्रकारातून प्रचार देखील नक्कीच करता येऊ शकतो. अशीच त्याची रचना आहे तसेच स्वरुपदेखील साध्य करता आले आहे. त्यामुळे नव्या पिढीपर्यंत हे ज्ञान अधिक प्रभावीपणे पोहचू शकेल. विश्वाचे गूढ उलगडेपर्यंत ही साहित्यकृती ही अभ्यासक, संशोधक, विचारवंत आणि वाचकांसाठी डॉ. मेहरा श्रीखंडे यांचे लिखाण नेहमीच ताजेतवाने राहणार आहे. मूळ इंग्रजीत असलेल्या या पुस्तकाचा मराठी अनुवाद पत्रकार अशोक शिंदे यांनी केला असून नक्कीच तो वाचनीय ठरला आहे. माईंड स्पिरिट वर्क्स या संस्थेच्या स्नेहल सिंग या पुस्तकाच्या प्रकाशिका आहेत.

# ठाण्यातील खोपट बसस्थानकावरील प्रवाशांमध्ये मतदानाबाबत जनजागृती

**ठाणे (रोहित जैसवार) -** लोकशाहीच्या उत्सवात मतदानाच्या दिवशी आपली सर्व कामे बाजूला ठेवून उज्वल भविष्यासाठी मतदानाचा हक्क बजावून लोकशाही बळकट करावी आणि सर्वांनी न चुकता दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी अवश्य मतदान करावे, असे आवाहन खोपट परिसरातील बसस्थानकावर करण्यात आले.

१४८ ठाणे विधानसभा मतदारसंघात निवडणूकविषयक मतदार जनजागृती व्हावी व मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती उर्मिला पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली खोपट परिसरातील



बसस्थानकावर मतदान जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

या जनजागृती मोहिमेत बसस्थानकाच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या ठिकाणी १४८ ठाणे विधानसभा मतदारसंघाचे मतदान जनजागृतीबाबत लावण्यात आलेले मोठे फलक हे प्रवाशांचे लक्ष वेधून घेत होते. यावेळी स्वीपच्या पथकाने बसस्थानकावरील प्रवाशांना मतदानाचे महत्व पटवून दिले. या कार्यक्रमात ठाणे परिवहन बसस्थानक येथील सर्व अधिकारी, कर्मचारी व प्रवासी सहभागी झाले होते. यावेळी 'मतदान जनजागृती'विषयक "माझं मत माझा अधिकार", "मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो" आणि "जागरूक मतदार लोकशाहीचा आधार" या घोषणा सर्व प्रवाशांनी मोठ्या आवाजात सामूहिकपणे दिल्या.

## पान १ वरून...

### >>"कडवट हिंदुत्ववादीपासून...

पुढे राज ठाकरे म्हणाले, "इथपर्यंत तुमची वेळ गेली? कडवट हिंदुत्ववादीपासून मुसलमानांसमोर लाचार होईपर्यंत. उबाठा शिवसेनेचे उमेदवार उर्दूत पत्रक काढत आहेत. कुठपर्यंत मजल गेली आहे बघा. मी मनसेच्या जाहिराती दिल्या मध्यंतरी वर्तमान पत्रांमध्ये. त्या तुम्ही कदाचित पाहिल्या असतील. मी टाइम्स ऑफ इंडियाच्या पहिल्या पानावरही मराठी जाहिरात दिली होती. इंग्रजी वर्तमानपत्र आहे म्हणून इंग्रजीत जाहिरात नाही दिली. सगळ्याच गोष्टी सोडून द्यायच्या असतील तर तुमच्याकडे (उद्धव ठाकरे) उरलं काय? आपल्याकडे इथे छान कंदिल आहे. चांगली गोष्ट आहे. आपण शिवाजी पार्क मैदानावर दीपोत्सव साजरा करतो. तो दीपोत्सव बघायला हजारोंच्या संख्येने लोक येतात. रविवारी अचानक सगळे लाइट बंद करुन टाकले. १४ तारखेला पंतप्रधान येणार आहेत. त्यामुळे दिवाळीचे लाइट्स काढून टाकले. दिवाळीच्या लाइटशी पंतप्रधानांच्या सुरक्षेशी काय संबंध? नको तिथे कशाला सिक्युरीटी?" असा सवाल राज ठाकरेंनी उपस्थित केला आहे.

### >>नाशिकमध्ये मुस्लीम बांधवांचा पक्षाला...

तिन्ही नेत्यांकडून या मतदारसंघात जोरदार प्रचार केला जात आहे. सर्व उमेदवार मतदारांना भेटून आकर्षित करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यातच आता मनसेचे उमेदवार दिनकर पाटील यांची ताकद वाढल्याचे दिसून येत आहे.

नाशिक पश्चिम विधानसभा मतदार संघातील मुस्लीम बांधवांनी अनोखा निर्णय घेतला आहे. मनसे पक्षाला पाठिंबा न देता उमेदवार दिनकर पाटील यांना मुस्लीम बांधवांनी पाठिंबा जाहीर केलाय. नाशिक पश्चिम मतदारसंघातील पांडवलेणी परिसरात असलेल्या एका दर्ग्यात दिनकर पाटील यांनी मुस्लीम बांधवांची भेट घेतली. यावेळी आम्ही कुठल्याही पक्षाला पाठिंबा देत नाही तर दिनकर पाटील या व्यक्तीला पाठिंबा दिला आहे, अशी भूमिका मुस्लीम बांधवांनी घेतली. यामुळे नाशिक पश्चिम विधानसभा मतदारसंघात दिनकर पाटील यांना बळ मिळणार असल्याची चर्चा आता रंगत आहे. आता या मतदारसंघात सुधाकर बडगुजर की सीमा हिरे की दिनकर पाटील? नेमकी कोण बाजी मारणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### >>सलग दुसऱ्या दिवशीही उद्धव ठाकरे यांच्या...

माझा तुमच्यावर राग नाही पण यांचा जो एकतर्फी कारभार सुरू आहे तो सर्वांसमोर यायला हवा. मोदी देखील आज प्रचाराला येतायत त्यामुळे मला जो न्याय तो मोदींना पण लागला पाहिजे, असे उद्धव ठाकरे यांनी निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितले.

### >>निवडणूक विशेष पोलीस निरीक्षकांनी...

प्रत्येक जिल्हयात तयार करण्यात आलेल्या कंट्रोल रुमच्या माध्यमातून मतदानाच्या एक दिवस आधी १९ नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रियेची अभिरुप चाचणी घेण्यात यावी, जेणेकरुन मतदानाच्या दिवशी येणाऱ्या संभाव्य अडचणी टाळता येतील. मतदान केंद्रावर मतदानासाठी येणारे उमेदवार हे मतदान झाल्यानंतर मतदान केंद्राच्या बाहेर १०० मीटर परिसरात रेंगाळणार नाहीत, याची दक्षता घेण्यात यावी, असे श्री. मिश्रा यांनी नमूद केले. मतदान केंद्रावर येणाऱ्या वयोवृद्ध मतदारांसाठी जास्तीत जास्त व्हीलचेअर उपलब्ध करण्यात याव्यात, जेणेकरुन मतदारांना मतदान केंद्रावर ताटकळत उभे रहावे लागणार नाही, यासाठी आपल्या विभागातील रुग्णालय, सेवाभावी संस्थांशी संपर्क साधून व्हीलचेअरची पुरेशी उपलब्धतता प्रत्येक मतदान केंद्रावर करण्यात यावी, अशी सूचना त्यांनी यावेळी केली.

एखाद्या मतदान केंद्रावर मशीनमध्ये काही तांत्रिक अडचण निर्माण होवून मतदान प्रक्रिया थांबली किंवा अन्य काही अडचण उद्भवली तर त्याचे वृत्त हे दिवसभर विविध वाहिन्यांवर दाखवले जाते. त्या ठिकाणी मतदान प्रक्रिया सुरळीत सुरू झाल्यावरसुध्दा ती बातमी तशीच सतत सुरू असते याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी याबाबतची माहिती घेवून संबंधित वाहिन्यांशी संपर्क साधून वस्तूस्थिती तात्काळ कळविण्याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी, जेणेकरुन निवडणूक विभागाची बदनामी होणार नाही, या दृष्टीने आवश्यक ती खबरदारी घ्यावी, अशी सूचनाही श्री. दीपक मिश्रा यांनी दिली. जिल्ह्यातील सर्व ठिकाणी भरारी पथकाच्या माध्यमातून सुरू असलेली वाहनांची तपासणी देखील काटेकोरपणे करण्याचे निर्देश निवडणूक विशेष पोलीस निरीक्षक दीपक मिश्रा यांनी पोलीस प्रशासनाला दिले. कोकण विभागातील सर्व जिल्हयांची मतदानाची तयारी ही अंतिम टप्प्यात असून एखादी समस्या उद्भवल्यास तात्काळ निवडणूक आयोगाशी समन्वय साधावा असे नमूद करीत त्यांनी निवडणूका नि:पक्षपातीपणे व निर्भयपणे पार पाडण्यासाठी सर्व जिल्हा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

### >>महाडमधील प्रदूषणप्रकरणी १०६...

महाडमधील वायु प्रदूषणासंदर्भात पूर्वी असलेली खाजगी संस्थांना द्यावयाची पद्धत व तपासणी शासनाच्या निर्देशानुसार बंद केली असून महाडमध्ये सीटीपी परिसरात प्रदूषण नियंत्रण मंडळाने या संदर्भात यंत्रणा स्थापित केली असून त्याचा ऑनलाइन पद्धतीने येणाऱ्या अहवालानुसार कारवाई केली जाते अशी माहिती दिली.

महाड वसाहतीमधील प्रदूषण करणाऱ्या कंपन्यांना आवश्यक त्या ठिकाणी वायू प्रदूषण या संदर्भात स्क्रबर बसवावेत असे सूचित करण्याचे अनुभव सांगून सीईटीपीमध्ये असलेली ही ऑनलाइन यंत्रणा २४ तास पाहणी केली जात असल्याचे त्यांनी नमूद केले. आगामी काळात महाड शहर व परिसरात वायु प्रदूषणाने अथवा पाणी प्रदूषणाने नागरिकांना त्रास होणार नाही याकरिता प्रदूषण नियंत्रण मंडळ सातत्यपूर्ण पद्धतीने २४ तास या सर्व संबंधित घटनांवर लक्ष ठेवून असून नागरिकांनाही या संदर्भात केलेल्या तक्रारीची योग्य दखल प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून घेतली जाईल असे स्पष्ट केले.या संदर्भात कारवाई करण्यात आलेल्या श्रीहरी सुदर्शन व इजी कंपनी व्यवस्थापनाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

### >>पिंपरी चिंचवड महापालिकेचे...

मतदान यंत्राच्या तपासणी आणि प्रशिक्षणाचे कामकाज सुरू आहे. आदर्श आचारसंहिता लागू असल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना प्रभावित करणार्या अनेक योजना थांबविण्यात आल्या आहेत. तसेच, बहुतांश अधिकारी व कर्मचारी इलेक्शन ड्युटीला असल्याने कामकाज जवळजवळ ठप्प आहे. इलेक्शन ड्युटीमुळे त्या कर्मचार्यांना महापालिका कामकाजातून तसेच, थॅम्ब इप्रेशनमधून सूट देण्यात आली आहे. अधिकारी व कर्मचार्यांची उपस्थित नसल्याने महापालिका भवन आणि क्षेत्रीय कार्यालये ओस पडली आहेत.

### >>प्रलंबित बिलाच्या मंजुरीसाठी २०...

तेंव्हा ११ नोव्हेंबर २०२४ रोजी ठाणे एसीबीच्या निरीक्षक राजश्री शिंदे यांच्या पथकाने सापळा कारवाई केली. यादरम्यान शिपाई देसले यांना संबंधित तक्रारदार यांच्याकडून २० हजार रुपये लाचेची रक्कम स्वीकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले. याचवेळी कार्यकारी अभियंता जाधव यांनाही ताब्यात घेण्यात आले. या दोघांविरुद्ध ठाणेनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# नवी मुंबईतील रो-हाऊसवर पोलिसांचा छापा

**नवी मुंबई (धनश्री सट्टा) :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या राज्यात 'आदर्श आचारसंहिता' लागू आहे. निवडणुकीच्या काळात मतं मिळविण्यासाठी मतदारांना रोख रक्कम दिली जात असल्याचा विरोधकांकडून आरोप होत असतो. या बाबींना आळा घालण्यासाठी आयकर विभाग, मुंबई पोलीस आणि निवडणूक आयोगाचे कर्मचारी हे गस्त घालत असतात. तसंच छापेमारी करत असतात. त्यातच आता नवी मुंबईमधील नेरुळ सेक्टर १६ येथील रो-हाऊसमधून पोलिसांनी अडीच कोटी रुपये जप्त केले आहेत. नेरुळ पोलीस ठाणे आणि निवडणूक आयोग यांनी ही संयुक्त कारवाई केली आहे.



या प्रकरणाबाबत अधिक माहिती अशी की, नवी मुंबईतील नेरुळ पोलीस ठाण्याला नेरुळ सेक्टर १६ येथील एका रो-हाऊसमध्ये बांधकाम व्यावसायिकाच्या घरात रोकड असल्याची माहिती मिळाली होती. त्यावरुन पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. सदरील रो-हाऊसवर छापा टाकण्यात आला असता एकूण २ कोटी ६० लाखांची रोकड सापडली. ही रक्कम कोणी आणि कोणत्या उद्देशानं घरात ठेवली होती, याचा अधिक तपास नेरुळ पोलीस करत आहेत.

निवडणूक अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, निवडणूक आयोग आणि नेरुळ पोलीस ठाणे यांनी केलेल्या संयुक्त कारवाईत ही रोकड जप्त करण्यात आली आहे. याविषयी अधिक माहिती देत वरिष्ठ पोलीस निरीक्षक ब्रम्हानंद नायकवडी सांगितलं की, "जप्त करण्यात आलेली रोकड कोणाची आहे? नवी मुंबईत कुठून आली? याचा तपास सध्या पोलिसांकडून सुरू आहे."

# बदलत्या हवामानाने स्ट्रॉबेरीचा हंगामाला विलंब

**नवी मुंबई (विशाल पाटील) :** एपीएमसी बाजारात ऑक्टोबरअखेर आणि नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीला स्ट्रॉबेरीचा हंगाम सुरू होतो. पाचगणी आणि महाबळेश्वरमध्ये काही ठिकाणी स्ट्रॉबेरीची लागवड करण्यात आली असली तरी पावसामुळे काही ठिकाणी लागवड झालेली नाही. लागवड केलेल्या रोपट्यांना पावसाचा फटका बसला आहे. त्यामुळे हंगामाला १५ दिवस उशिराने सुरुवात होणार आहे. परिणामी सध्या बाजारात स्ट्रॉबेरी कमी प्रमाणात दाखल होत आहे.



स्ट्रॉबेरी चा मुख्य बहर नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी महिन्यांत असतो. हा बहर जून महिन्यापर्यंत सुरू राहतो. डिसेंबर, जानेवारी महिन्यांत सर्वाधिक स्ट्रॉबेरी बाजारात विक्रीसाठी दाखल होत असून ऑक्टोबर अखेर- नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीला वाशीच्या एपीएमसी बाजारात स्ट्रॉबेरी दाखल होण्यास सुरुवात होते. बाजारात सध्या तुरळक आवक होत आहे. महाबळेश्वर स्ट्रॉबेरी प्रतिकिलो ४०० ते ७०० रुपये तर नाशिकच्या स्ट्रॉबेरीची ३०० ते ५०० रुपये किलो दराने विक्री होत आहे. साधारणत: स्ट्रॉबेरी पिकाचे उत्पादन निघण्यासाठी दोन ते अडीच महिने कालावधी लागतो.

# लांब पल्ल्याच्या गाड्यांना भाईदरमध्ये थांबा मिळणार

## रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांचे आश्वासन

**भाईंदर (भावना जैन) -** भाईंदर गुजरात आणि राजस्थानला जाणाऱ्या लांब पल्ल्याच्या गाड्या भाईंदर स्थानकात थांबवण्यात येतील अशी माहिती अशी माहिती केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. भाईंदर मध्ये महायुतीचे उमेदवार नरेंद्र मेहता यांच्या प्रचारासाठी ते आले होते. शहरातील हजारो प्रवाशांची होणारी गैरसोय मेहता यांनी लक्षात आणून दिल्यानंतर रेल्वेमंत्र्यांनी हे आश्वासन दिले.



मिरा-भाईंदर मुबंई लगतचे जलद गतीने विकसित होणारे शहर असून लोकसंख्या १५ लाखांचा जवळपास पोहचली आहे. शहरात गुजरात व राजस्थान मधील नागरिकांची संख्या अधिक आहे. त्यांना गावी जायचे असल्यास बोरिवली आणि मुबईतील रेल्वे स्थानकातून मेल गाड्या पहाटे पकडव्या लागतात.यादरम्यान नागरिकांना संबंधित रेल्वे स्थानका पर्यंत पहाटे किंवा गर्दीच्या वेळी पोहचण्यासाठी मोठी कसरत करावी लागते.

प्रामुख्याने वयोवृद्ध ,लहान मुलांना आणि गर्भवती महिलांना त्रास सहन करावा लागतो. रविवारी प्रचारासाठी रेल्वे मंत्र अश्वीनी वैष्णव भाईंदर येथे आले होते. शहरातील नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन मेहता यांनी गुजरात व राजस्थानला गुजरात सुपर फास्ट , कर्णावती एक्सप्रेस , अहमदाबाद वंदे भारत , सौराष्ट्र मेल ,जोधपुर एक्सप्रेस , सूर्यनगरी एक्सप्रेस , रणकपुर एक्सप्रेस आदी रेल्वे गाड्या भाईंदर रेल्वे स्थानकात थांबवण्याची मागणी केली. यावर वैष्णव यांनी लवकरच गुजरात आणि राजस्थान जाणाऱ्या सर्व गाड्या भाईंदर रेल्वे स्थानकात थांबाव्यात आवश्यक कार्यवाही हाती घेणार असल्याचे सांगितले.

# रिक्षामध्ये विसरलेला आठ लाखाचा ऐवज महिला प्रवाशाला परत

**डोंबिवली (प्रथमेश चव्हाण)** – शिळफाटा रस्त्यावरील पलावा येथून कल्याण पश्चिमेतील राज्य परिवहन महामंडळाच्या बस आगारात रिक्षेतून येत असताना एका महिला प्रवाशाची सोन्याचा ऐवज, रोख रक्कम असा आठ लाखाचा ऐवज असलेली पिशवी आगाराजवळ उतरल्यावर रिक्षेत विसरली. महात्मा फुले पोलिसांनी सहा तास सलग तपास करून संबंधित रिक्षेचा शोध घेऊन संबंधित महिला प्रवाशाला ऐवजासह पिशवी परत केली.



पोलिसांनी दिलेली माहिती अशी, अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील एक महिला शकुंतला कुरकुटे या डोंबिवलीतील पलावा येथे आपल्या नातेवाईकाकडे आल्या होत्या. शुक्रवारी त्या पलावा येथून रिक्षेने कल्याणमधील महाराष्ट्र राज्य परिवहन महाममंडळाच्या बस स्थानकाजवळ आल्या. घाईगडबडीत उतरताना त्यांच्या जवळील ११ तोळे सोन्याचे दागिने, मोबाईल, रोख रक्कम असलेली पिशवी रिक्षेत राहिली. रिक्षा चालक घटनास्थळावरून निघून गेल्यावर त्यांना आपली पिशवी रिक्षेत विसरल्याचे लक्षात आले.

शकुंतला कुरकुटे यांनी महात्मा फुले पोलीस ठाण्यात जाऊन घडला प्रकार सांगितला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक विलास मडके यांच्या पथकाने पलावा ते कल्याण बस स्थानकापर्यंतचे सर्व सीसीटीव्ही चित्रण तपासले. सहा तास ही पाहणी सुरू होती. या पाहणीनंतर सीसीटीव्ही चित्रण तपासून पोलिसांनी संबंधित रिक्षा वाहन क्रमांकाच्या आधारे त्या रिक्षा चालकाचा शोध घेतला. त्यांच्या रिक्षेत महिला प्रवासी विसरलेली पिशवी ताब्यात घेतली. पिशवीतील ऐवजाला कोणीही हात लावला नव्हता. तक्रारदार शकुंतला कुरकुटे यांना त्यांची सोन्याचा ऐवज असलेली पिशवी वरिष्ठ पोलीस निरीक्षक साबळे यांच्या हस्ते परत करण्यात आली. या शोध कार्यात हवालदार मनोहर चित्ते, किशोर सूर्यवंशी, आनंद कांगरे, दीपक थोरात, महेंद्र मंझा यांनी सहभाग घेतला.

# ठाणे जिल्ह्याच्या प्रचारातून वाहतूक कोंडीचा मुद्दाच हरवला

**ठाणे (यश सावंत) :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला असलेल्या ठाणे जिल्ह्यात हजारो कोट्यवधी रुपयांचे पायाभूत सुविधा प्रकल्प आणि सार्वजनिक वाहतुकीचे राष्ट्रीय प्रकल्प उभारले जात असले तरी जिल्ह्यातील प्रामुख्याने कल्याण ग्रामीण आणि पश्चिम, डोंबिवली, ठाणे शहर, भिवंडी ग्रामीण आणि पश्चिम याचबरोबर शहापूर या विधानसभा मतदारसंघांमधील अंतर्गत आणि बाह्य रस्त्यांवरील वाहतूक कोंडीची समस्या जटील आहे. परंतु विधानसभा निवडणूक रिंगणात उतरलेले आणि स्वतःला भावी आमदार म्हणून भूषण मिरवणाऱ्या सर्व उमेदवारांनी वाहतूक कोंडीच्या मुद्द्याला प्रचारात पूर्णपणे बगल दिली आहे. यामुळे ठाणे जिल्ह्याच्या प्रचारातून वाहतूक कोंडीचा मुद्दाच हरवला असल्याचे चित्र दिसून येत आहे.



ठाणे जिल्ह्यातील सर्वच विधानसभा मतदारसंघांमध्ये सर्वच उमेदवारांकडून निवडणुकीचा जोरदार प्रचार सुरू आहे. यंदा जवळपास सर्वच पक्षातील उमेदवारांकडून मोठी विकासकामे, आर्थिक मदतीची घोषणा, महापुरुषांची स्मारके तर विविध समाजासाठी भव्य वास्तू यांसारख्या अनेक घोषणांचा पाऊस पाडण्यात येत आहे. परंतु जिल्ह्यातील सर्वात मोठा प्रश्न असलेल्या आणि दिवसेंदिवस अधिक त्रासदायक होत असलेल्या वाहतूक कोंडीच्या विषयाला सर्वच उमेदवारांनी आपल्या प्रचार मुद्द्यातून बगल दिली असल्याचे दिसून येत आहे.

एकीकडे जिल्ह्यात मुंबई – अहमदाबाद बुलेट ट्रेन, मुंबई – बडोदा राष्ट्रीय महामार्ग, मालवाहतुक विशेष रेल्वे मार्ग, ऐरोली – काटई उन्नत मार्ग, कल्याण रिंग रोड यांसारखे काही हजार कोटी रुपयांचे प्रकल्प उभारले जात आहेत. या प्रकल्पांच्या पूर्णत्वात आपला आणि आपल्या पक्षाचा वाटा किती महत्वाचा आहे, याबाबत उमेदवार आवर्जून भाष्य करत आहे. परंतु गेल्या अनेक वर्षांपासून जिल्ह्याला भेडसावणाऱ्या आणि मूळ प्रश्न असलेल्या वाहतूक कोंडीबाबत कोणीही आपल्या जाहीर सभेतून अथवा प्रचार मोहिमेतून विषय काढण्यास देखील तयार नाही. यामुळे प्रचार मोहिमेतून केवळ आपली राजकीय भूमिकाच पुढे रेटून नेण्यात व्यस्त असलेल्या उमेदवारांना त्यांच्याच मतदारसंघातील प्रमुख प्रश्न असलेला वाहतूक कोंडीचा मात्र सराईतपणे विसर होताना दिसून येत आहे.

कापूरबावडी ते फाउंटन हॉटेल या १५ किमी अंतराच्या मार्गावर गेल्या काही वर्षांपासून सातत्याने वाहतूक कोंडी होते. या मार्गावरून अवजड वाहतुक मोठ्याप्रमाणात सुरू असते. या मार्गावर कापूरबावडी नाका, मानपाडा, ब्रह्मांड नाका, आनंदनगर, कासारवडवली, गायमुख, घाट रस्ता, फाउंटन हॉटेल हे वाहतूक कोंडीची ठिकाणे आहेत.

ठाणे शहरातील आनंदनगर टोल नाका ते माजीवडा असा पूर्व द्रुतगती महामार्ग जातो. या ९ किमी अंतराच्या मार्गावर आनंदनगर, तीन हात नाका उड्डाण पूल, नितीन कंपनी उड्डाण पूल, माजीवडा उड्डाण पूल येथे कोंडी होते. त्याचा परिणाम अंतर्गत मार्गावर होतो.

कल्याण शिळफाटा रस्ता सुमारे २१ किलोमीटर लांबीचा ६ पदरी आहे. कल्याण शिळफाटा रस्त्यावरील पलावा चौक येथील उड्डाण पुलाचे, रेल्वे मार्गावरील पुलाचे काम रखडले आहे. पलावा चौकात एक ते दोन किमी परिसरात दररोज वाहतूक कोंडी होते. येथूनच जवळ असलेल्या कल्याण फाटा ते महापे रस्त्याची दुरवस्था झाल्याने कायम कोंडी असते. कल्याण शहरातील मानपाडा रस्ता ते टाटा नाका, बैलबाजार ते लालचौकी रस्ता मानपाडा रस्ता ही वाहतूक कोंडीची प्रमुख ठिकाणे झाली आहेत. डोंबिवली शहरातील मोठागाव माणकोली फाटक येथे दोन्ही बाजुला वाहनांच्या रांगा लागलेल्या असतात.

काटई ते बदलापूर रस्त्यावर रस्तारुंदीकरण आणि काँक्रीटीकरणाचे काम सुरू असल्याने नियमित वाहतूक कोंडी असते. तळोजाकडून कल्याणकडे येणारी आणि कल्याणकडून तळोजाकडे जाणारी वाहने शिळफाटा रस्त्यावर काटई येथे वाहतूक कोंडीत अडकतात.

मुंबई नाशिक महामार्गावरून कल्याण – भिवंडी येथील हजारो वाहने मुंबई आणि ठाण्याच्या दिशेने वाहतुक करतात. वाहतुक कोंडी, अरुंद रस्ते यामुळे भिवंडी बायपास वरून अवघ्या अर्धा ते पाऊण तासाचे अंतर पार करण्यासाठी वाहन चालकांना सव्वा ते दीड तास लागतो.

# माध्यमिक शाळांच्या वेळेत दिवाळी सुट्टीनंतर बदल, माध्यमिक शाळा पूर्वीप्रमाणेच सकाळी ८ ते २ या वेळेत

**नवी मुंबई (सम्यक कासारे) :** नवी मुंबई महापालिकेने शासन निर्णयानुसार, माध्यमिक शाळा भरण्याची वेळ सकाळी १०.५० ते ४.२५ केली होती. त्यानुसार पहिल्या सत्रात शाळा सुरू होत्या. परंतु आता सोमवारपासून दिवाळीनंतर माध्यमिक विभागाच्या शाळा भरण्याच्या वेळेत पुन्हा बदल करण्यात आला असून पालिकेच्या माध्यमिक विभागाच्या शाळांची वेळ पुन्हा आधीप्रमाणेच सकाळी ८ ते दुपारी २ करण्यात आली आहे. माध्यमिक शाळांची वेळ पूर्वीप्रमाणेच करण्याची मागणी पालक व शिक्षक संघटनांनी लावून धरली होती. राज्य शासनाच्या ८ फेब्रुवारी २०२४ च्या पत्रकानुसार सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांनी पूर्वप्राथमिक ते इयत्ता ४ थी पर्यंतचे वर्ग सकाळी ९ किंवा ९ नंतर भरवण्याचे निर्देश दिले होते. या शासनाच्या निर्देशानुसार राज्यभरात १५ जून २०२४ या नव्य शैक्षणिक वर्षापासूनच या नियमाची अंमलबजावणी करण्यात आली होती. नवी मुंबई महापालिकाक्षेत्रात महापालिकेच्या ५० पेक्षा अधिक शाळा असून ५० हजारापेक्षा अधिक विद्यार्थी पालिकेच्या शाळेत शिक्षण घेत आहेत. सुरुवातीला शाळांच्या वेळा बदलाला शिक्षक संघटनांनी विरोध केला होता. परंतु पालिका प्रशासन निर्णयावर ठाम होते. माध्यमिक शाळांच्या वेळेत पालिकेने बदल केला असून दुसरीकडे प्राथमिक विभागाच्या शाळांच्या वेळेतही बदल करण्याची मागणी शिक्षक संघटनांनी केली आहे. प्राथमिक विभागाच्या शाळा पटसंख्येमुळे विविध वेळेत भरत आहेत. नवी मुंबई महापालिकेच्या माध्यमिक शाळांच्या वेळा बदलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# आचार संहितेच्या काळात २३ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त; लाखो लिटर दारू; ६ कोटींचे मोफत वाटप साहित्य; १ कोटींचे अंमली पदार्थ

**ठाणे (रोहित जैसवार) :** जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघामध्ये आचार संहितेच्या काळात मागील सुमारे एक महिन्याच्या कालावधीत २३ कोटी ४१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यामध्ये १२ कोटी रुपयांची रोख रक्कम पकडण्यात आली असून यातील सर्वाधिक ४ कोटी रक्कम शहापूर विधानसभा मतदारसंघातून जप्त करण्यात आली आहे. तर भिवंडी ग्रामीण मतदारसंघातून तब्बल १ लाख लिटर दारू जप्त करण्यात आली आहे. तर ओवळा माजिवडा मतदारसंघातून १ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहे. तर ठाणे शहर विधानसभेतून ३ कोटी ३३ लाख रुपयांचे मतदारांना वाटण्यासाठीचे मोफत साहित्य जप्त करण्यात आले आहे. अशी माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने देण्यात आली आहे.




राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्हा निवडणूक विभागांच्या पथकांकडून ठिकठिकाणी वाहनांची तपासणी करण्यात येत असते. यामध्ये अवैध पद्धतीने रोख रक्कम, मद्य, अंमली पदार्थ आणि मतदारांना वाटण्यासाठी नेण्यात येणाऱ्या वस्तू यांसारखा मुद्देमाल निवडणूक विभागाच्या पथकाकडून कारवाई करून जप्त करण्यात येत असतो. याच पद्धतीने जिल्ह्यात आचार संहिता लागू झाल्यापासून जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघांमध्ये निवडणूक विभागाच्या भरारी पथकाकडून कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये एकूण २३ कोटी ४१ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल प्रशासनाकडून जप्त करण्यात आला आहे. यामध्ये १२ कोटी ४१ लाख १६ हजार रोख रक्कम, २ कोटी २२ लाख १४ हजार रुपये किंमतीचा मद्यसाठा, १ कोटी ६४ लाख ७० हजार रुपये किंमतीचे अंमली पदार्थ, २३ लाख २६ हजार रुपये किंमतीच्या मौल्यवान वस्तू, दागिने आणि ६ कोटी ८९ लाख ७९ हजार रुपये किंमतीचे मोफत वाटपाचे साहित्य ठाणे जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांमधून प्रशासनाकडून जप्त करण्यात आले आहे.

## सर्वाधिक घबाड कुठे?
## ( विधानसभा निहाय सर्वाधिक रक्कम )

शहापूर – ४ कोटी
बेलापूर – ३ कोटी २४ लाख
भिवंडी पूर्व – २ कोटी ३० लाख
मीरा भाईंदर – १ कोटी ४९ लाख

**सर्वाधिक मद्य (रुपये)**

भिवंडी ग्रामीण – ४८ लाख
कल्याण पूर्व – ३५ लाख
शहापूर – २२.७४ लाख

सर्वाधिक अंमली पदार्थ (रुपये)


ओवळा माजिवडा – १ कोटी २६ लाख
ऐरोली – १४ लाख

### सर्वाधिक मोफत वाटपाचे साहित्य (रुपये)

ठाणे – ३ कोटी ३३ लाख
भिवंडी ग्रामीण – ८८ लाख
बेलापूर – ५१ लाख
भिवंडी पश्चिम – ४७ लाख

# बॉलिवूड अभिनेता शाहरुख खानला मिळाली धमकी, मुंबई पोलिसांनी रायपूरच्या वकिलाला केली अटक

अभिनेता सलमान खाननंतर नुकतेच शाहरुख खानला जीवे मारण्याच्या धमक्या आल्या होत्या. यानंतर मुंबई पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. धमकी प्रकरणी छत्तीसगडच्या रायपूर येथून एका संशयित व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. सध्या बॉलिवूडमध्ये स्टार्सना सतत धमक्या येत आहेत. सलमान खान सध्या लॉरेन्स बिश्नोई टोळीच्या निशाणावर आहे. दरम्यान, शाहरुख खानलाही जीवे मारण्याच्या धमकी आल्यानंतर आता बॉलिवूडमध्ये अनेकजण घाबरून आहेत. याप्रकरणी पोलिसात नोंद करण्यात आली आहे. आता मुंबई पोलिसांना धमकी प्रकरणी संशयित व्यक्तीची चौकशी सुरू केली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, व्यक्तीच्या अटकेबाबत मुंबई पोलिसांनी सांगितलं की, शाहरुख खानला जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या आरोपीचं नाव मोहम्मद फैजान असून तो एक वकिल आहे. या वकिलानं शाहरुख खानकडून ५० लाख रुपयांची मागणी केल्याचा आरोप आहे. या आरोपीला रायपूर, छत्तीसगड येथून ताब्यात घेतलं आहे. शाहरुख खानला मिळालेल्या धमकीची माहिती वांद्रे पोलिसांना मिळाली होती. पोलीस ठाण्यातच एक फोन आल्याचे सांगण्यात आलंय. ५ नोव्हेंबर रोजी वांद्रे पोलिस स्टेशनच्या नंबरवर एक फोन आला आणि आरोपीनं यात म्हटलं "तो बँडस्टँडचा शाहरुख आहे, त्याला ५० लाख द्याला लावा नाहीतर मी त्याला मारून टाकेन." ती व्यक्ती कोण बोलत आहे, असं पोलिसांनी विचारलं असता त्यानं सांगितलं की, "काही फरक पडत नाही, माझे नाव हिंदुस्थानी लिहा."

यानंतर मुंबई पोलिसांनी तात्काळ कारवाई केली. हा क्रमांक छत्तीसगडमधील फैजान या व्यक्तीच्या नावानं नोंदणीकृत असल्याचं पोलिसांना समजलं. यानंतर या व्यक्तीशी बोलले, तेव्हा या घटनेच्या तीन दिवस आधी म्हणजे २ नोव्हेंबर रोजी त्याचा फोन चोरीला गेल्याचे समोर आले होते. त्याचा फोन शोधून देखील मिळू शकला नाही. याशिवाय या व्यक्तीनं रायपूरमध्ये फोन चोरीची तक्रारही नोंदवली होती. तसेच फैजानचा फोन काही दिवसांपूर्वी हरवला होता. याबाबत त्यानं देखील माहिती दिली आहे. शाहरुख खानला पहिल्यांदाच धमकी मिळाली आहे असं नाही. तो नेहमीच अंडरवर्ल्डच्या हिटलिस्टमध्ये असतो. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्येही 'पठाण' आणि 'जवान' चित्रपटांच्या यशानंतर त्याला सतत जीवे मारण्याच्या धमक्या येत होत्या. शाहरुखला आता वाय प्लस सुरक्षा देण्यात आली आहे. पोलिसांनी मोहम्मद फैजानविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ३०८(४) (जीवे मारण्याची धमकी देऊन खंडणी) आणि ३५१ (३) (४) (गुन्हेगारी कट) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

## दिनविशेष

**घटना :**

१८४१ : जेम्स ब्रॅडी यांना प्राण्यांच्या मोहामुळे संमोहनाचा अभ्यास करण्याची प्रेरणा मिळाली.

१८६४ : ग्रीस देशाने नवीन संविधान स्वीकारले

१९१३ : रवींद्रनाथ टागोर यांना त्यांच्या गीतांजली या साहित्यासाठी स्वीडिश अकादमीने साहित्यातील नोबेल पारितोषिक प्रदान केले.

१९२१ : वामनराव पटवर्धन यांनी पुढाकार घेऊन पुण्यात अखिल भोर संस्थान प्रजा सभेची स्थापना केली.

१९३१ : शंकर रामचंद्र आणि मामाराव दाते यांनी देवनागरी लिपी एका मोनोटाइप मशीनवर यशस्वीरित्या स्थापित केली.

१९८९ : हंस-ॲडम II, सध्याचा लिक्टेनस्टीनचा राजकुमार, त्याच्या वडिलांच्या मृत्यूनंतर त्याची कारकीर्द सुरू झाली

१९९४ : एका सार्वमतामध्ये, स्वीडनमधील मतदारांनी युरोपियन युनियनमध्ये सामील होण्याचा निर्णय घेतला.

१९९५ : पूर्वीच्या ब्रिटीश साम्राज्याचा भाग न होता राष्ट्रकुल राष्ट्रांमध्ये सामील होणारे मोझांबिक हे पहिले राज्य बनले.

२००२ : इराक निशस्त्रीकरण संकट : इराक संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या ठराव १४४१ च्या अटींशी सहमत.

२०१२ : ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण प्रशांत महासागराच्या काही भागात पूर्ण सूर्यग्रहण झाले.

२०१३ : 4 वर्ल्ड ट्रेड सेंटर अधिकृतपणे उघडले.

**जन्म :**

१७८० : 'रणजितसिंग' – शिख साम्राज्याचे संस्थापक महाराजा यांचा जन्म. (मृत्यू : २७ जून १८३९)

१८५० : 'आर. एल. स्टीव्हनसन' – इंग्लिश लेखक व कवी यांचा जन्म. (मृत्यू : ३ डिसेंबर १८९४)

१८५५ : 'गोविंद बल्लाळ देवल' – आद्य मराठी नाटककार यांचा जन्म. (मृत्यू : १४ जून १९१६)

१८७३ : 'बॅ. मुकुंद रामराव जयकर' – कायदेपंडित, पं. मोतीलाल नेहरूंचे सहकारी, संसदपटू आणि पुणे विद्यापीठाचे पहिले कुलगुरू यांचा जन्म. (मृत्यू : १० मार्च १९५९)

१८९८ : 'इस्कंदर मिर्झा' – पाकिस्तानचे पहिले राष्ट्रपती यांचा जन्म. (मृत्यू : १३ नोव्हेंबर १९६९)

१९१७ : 'वसंतदादा पाटील' – महाराष्ट्राचे ५ वे व ९वे मुख्यमंत्री यांचा जन्म. (मृत्यू : १ मार्च १९८९)

१९१७: 'गजानन माधव मुक्तिबोध' – हिंदी कवी, लेखक, टीकाकार व संपादक यांचा जन्म. (मृत्यू : ११ सप्टेंबर १९६४)

१९५४: 'स्कॉट मॅकनीली' – सन मायक्रोसिस्टिम्स चे सहसंस्थापक यांचा जन्म.

१९६७ : 'जूही चावला' – अभिनेत्री यांचा जन्म.

**मृत्यू :**

१७४० : 'कृष्णदयार्णव' – प्राचीन मराठी कवी यांचे निधन.

१९५६ : 'इंदुभूषण बॅनर्जी' – शीख धर्माचा समग्र इतिहास लिहिणारे आधुनिक बंगाली इतिहासकार यांचे निधन. (जन्म : १ नोव्हेंबर १८९३)

२००१ : 'सरोजिनी मधुसूदन शारंगपाणी' – ज्येष्ठ लेखिका यांचे निधन. (जन्म : १५ ऑगस्ट १९१७)

२००२ : 'ऋषिकेश साहा' – नेपाळी लेखक, राजकारणी व मानवाधिकार कार्यकर्ते यांचे निधन.

# उपाशी पोटी गरम पाणी का प्यावं?



ताप किंवा सर्दी झाल्यावरच अनेकजण गरम पाण्याकडे वळतात. मात्र, एक ग्लास गरम पाण्यानं दिवसाची सुरुवात केल्यास तुमचं एकंदर आरोग्य सुधारु शकते. शरीर निरोगी ठेवण्यासाठी गरम पाणी एक सोपे आणि शक्तीशाली मार्ग आहे. यामुळे पचनक्रिया तर सुधारते. तसंच शरीरातील विशारी घटक बाहेर टाकण्यासाठी देखील गरम पाणी फायदेशीर आहे.

सकाळी उठल्यावर उपाशी पोटी दोन ग्लास गरम पाणी प्यायल्यास अनेक आजार दूर राहतात. पोट साफ करण्यासाठी गरम पाणी उत्तम आहे. गरम पाणी प्यायल्यास त्वचेसंबंधित समस्या दूर होवू शकतात. शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकण्यास गरम पाणी फायदेशीर आहे. यामुळे त्वचा चमकू लागते. तसंच त्वचेची लवचिकता टिकवून ठेवण्यासाठी गरम पाणी फायदेशीर आहे. शरीर हायड्रेटेड ठेवल्यास चेहऱ्यावरील सुरकुत्या कमी करण्यास मदत होते.

रात्री झोपण्यापूर्वी गरम पाणी प्यायल्यास ढेकर येणे, पोट फुगणे यासारख्या समस्या दूर होतात.

आतड्यांमध्ये अतिरिक्त टाकाऊ पदार्थ राहिल्यामुळे बद्धकोष्ठ, पोटदुखी, पोट फुगणे अशा समस्या उद्भवतात. बद्धकोष्ठतेचा त्रास असलेल्या लोकांनी दररोज रिकाम्या पोटी गरम पाणी प्यायल्यास अन्न त्वरित पचते आणि शरीरातील टाकाऊ घटक बाहेर काढले जातात. यामुळे बद्धकोष्ठतेचा त्रास दूर होतो.

गरम पाणी प्यायल्यास रक्त प्रवाह सुरळीत होतो. ज्यामुळे शरीराला आवश्यक पोषक आणि ऑक्सिजन मिळते.

गरम पाणी प्यायल्यानं मज्जासंस्थेचे कार्य सुरळीत राहते. तसंच, गरम पाण्यानं शरीरातील विषारी द्रव्ये बाहेर पडत असल्याने वृद्धत्वाचा धोका होत नाही.

जास्त तेलकट किंवा गोड पदार्थ खाल्ल्यास छातीत जळजळ होते. ही जळजळ दूर करण्यासाठी तेलकट पदार्थ खाण्याच्या अर्धा तासानंतर गरम पाणी प्या. यामुळे जळजळ कमी होते.

ज्यांना वजन कमी करायचं आहे. त्यांनी गरम पाण्यामध्ये लिंबाचा रस पिळून प्यायल्यास वजन छपाट्यानं कमी होते.

**हे आजार होतात ठिक**

- मज्जातंतूंचे आजार बरे होतात.
- उच्च रक्तदाब नियंत्रित राहतो.
- तणाव कमी होतो.
- किडनीशी संबंधित आजार होत नाहीत.
- फुफ्फुसे, मेंदू आणि हृदय मजबूत होतो.
- शरीरातील कफ काढून टाकते.
- मुरुम नाहीत, त्वचेची समस्या नाही.

# दिग्दर्शक रोहित शेट्टींच्या हस्ते 'रानटी'चा जबरदस्त ट्रेलर प्रदर्शित



नावीन्याचा ध्यास घेऊन वेगवेगळे प्रयोग करण्यासाठी प्रसिद्ध असलेले दिग्दर्शक समित कक्कड मराठी सिनेसृष्टीत रानटी धडाकेबाज ॲक्शनपट घेऊन येतायेत. पुनीत बालन स्टुडिओ निर्मित आणि समित कक्कड दिग्दर्शित 'रानटी' हा मराठीतला सगळयात मोठा ॲक्शनपट असणार आहे. ॲक्शनचे बादशहा असणारे प्रसिद्ध बॉलीवूड दिग्दर्शक रोहित शेट्टी यांनी या चित्रपटाचा जबरदस्त ट्रेलर प्रदर्शित केला आहे.

माणसात दोन शक्ती कार्यरत असतात. एक त्याला वाईट आणि अयोग्य गोष्टींकडे आकर्षित करते तर दुसरी त्या बाबतीत नकारघंटा वाजवून चांगल्याकडे खेचू पाहते. पण जेव्हा माणसातील रानटी शक्ती इतकी प्रबळ होते की माणसातील चांगले गुण नाहीसे होत थैमान घालणारी माणसं दिसू लागतात. याच थैमान शक्तीला आवरण्यासाठी काही जणांना रानटी व्हावे लागते. आजूबाजूची परिस्थिती त्यांना तसं बनवत असेल कदाचित त्यामुळेच काही रानटी असतात तर काही बनतात... असाच रानटीपणा घेऊन या दशकातील सर्वात मोठा 'अँग्री यंग मॅन' दिग्दर्शक समित कक्कड २२ नोव्हेंबरला आपल्या भेटीला घेऊन येणार आहेत. दमदार व्यक्तिरेखा, ॲक्शन, इमोशन्स, सूडनाट्य असा जबरदस्त मसाला असलेला हा धमाकेदार चित्रपट असल्याचे दिग्दर्शक समित कक्कड सांगतात.

आपल्या निर्मिती संस्थेच्या माध्यमातून कायम उत्तम कलाकृतीला पाठिंबा देणारे निर्माते पुनीत बालन म्हणाले की, मराठीत ॲक्शन, ड्रामा, इमोशनचा पुरेपूर मसाला असलेले चित्रपट क्वचितच दिसतात. त्यामुळे प्रेक्षकांना आवडेल असं काहीतरी हटके मसालेदार विषय घेऊन येण्याचा आमचा मानस होता. मराठीत एक वेगळा प्रयत्न आम्ही 'रानटी' चित्रपटाच्या निमित्ताने केला आहे हा प्रयत्न प्रेक्षकांना नक्कीच आवडेल.

भगवान विष्णूंचा सर्वात उग्र अवतार म्हणून नरसिंह अवतार ओळखला जातो. पातळपूरातील अशाच अधर्मी वृत्तीचा नाश करण्यासाठी विष्णु येतोय. याच विष्णूचा दमदार अवतार ट्रेलर मध्ये पहायला मिळतोय. पिळदार शरीरयष्टी, वाघासारखी नजर, चित्यासारखा वेग लाभलेलं भारदस्त व्यक्तिमत्त्व असलेले अभिनेते शरद केळकर 'रानटी' मध्ये शीर्षक भूमिकेत आहे. 'रानटी' च्या पोस्टर, टीझर, ट्रेलर मधून शरद यांचं 'अँग्री यंग मॅन' रूपच समोर आलं आहे. स्वत:चं अस्तित्व सिद्ध करताना कुटुंब आणि प्रेमावर घाला घालणाऱ्या खलनायकाला धोबीपछाड देणारा डॅशिंग विष्णूला रुपेरी पडद्यावर पहाणं ही प्रेक्षकांसाठी जणू एक मेजवानीच ठरणार आहे. अखेरच्या क्षणापर्यंत प्रेक्षकांना खुर्चीला खिळवून ठेवण्यासाठी विष्णूचा 'रानटी' अवतार सज्ज झाला आहे. प्रसिध्द अभिनेता शरद केळकर यांच्यासोबत संजय नार्वेकर, संतोष जुवेकर, नागेश भोसले, जयवंत वाडकर, संजय खापरे, छाया कदम, अक्षया गुरव, कैलास वाघमारे, माधव देवचक्के, सुशांत शेलार, हितेश भोजराज, सानवी श्रीवास्तव,नयना मुखे अशी तगडी स्टारकास्ट 'रानटी' चित्रपटात आहे.

'रानटी' चित्रपटासाठी हृषिकेश कोळी यांचं लिखाण, अजित परब यांचं संगीत, अमर मोहिले यांचं पार्श्वसंगीत, एझाज गुलाब यांची साहसदृष्ये, सेतु श्रीराम यांचं छायाचित्रण, आशिष म्हात्रे यांचं संकलन अशी भक्कम तांत्रिक बाजू असलेली टीम ह्या चित्रपटाला लाभलेली आहे.

## राशी भविष्य

**मेष :** आज चंद्र मीन राशीत स्थित आहे. आपल्या राशीपासून चंद्र बाराव्या भावात असणार आहे. आज दिवसभर प्रतिकूलतेचा सामना करावा लागेल. शारीरिक आणि मानसिक अस्वस्थता अनुभवाल. विनाकारण खर्च वाढतील. आर्थिक गुंतवणूक करू शकाल.

**वृषभ :** आज चंद्र मीन राशीत स्थित आहे. आपल्या राशीपासून चंद्र लाभात असणार आहे. आजचा दिवस आनंदाचा आहे. व्यापार आणि प्राप्तीत वाढ होईल. कुटुंबीय आणि मित्र यांच्यासह आनंदात राहू शकाल.

**मिथुन :** आज चंद्र मीन राशीत स्थित आहे. आपल्या राशीपासून चंद्र दशमात असणार आहे. आज शारीरिक, मानसिक सुख चांगले मिळेल. नोकरी- व्यवसायात आपल्या कामाची प्रशंसा होईल. व्यापारी कामाची कदर करतील. त्यामुळं आपणास जास्त प्रोत्साहन मिळेल.

**कर्क :** आज चंद्र मीन राशीत स्थित आहे. आपल्या राशीपासून चंद्र भाग्यात असणार आहे. आज नशिबाची साथ लाभून अचानक धनलाभ होईल. विदेशी जाण्यासाठी केलेले प्रयत्न यशस्वी होतील.

**सिंह :** आज चंद्र मीन राशीत स्थित आहे. आपल्या राशीपासून चंद्र अष्टमात असणार आहे. आज प्रकृतीकडं लक्ष द्यावं लागेल. प्रकृतीसाठी खर्च करावा लागेल. नकारात्मक विचार आपणाला चुकीच्या मार्गावर नेणार नाहीत ह्याची काळजी घ्यावी. कुटुंबियांशी मतभेद होतील.

**कन्या :** आज चंद्र मीन राशीत स्थित आहे. आपल्या राशीपासून चंद्र सातव्या भावात असणार आहे. आज दांपत्य जीवनात सुखद क्षण अनुभवाल.

**तूळ :** आज चंद्र मीन राशीत स्थित आहे. आपल्या राशीपासून चंद्र सहाव्या भावात असणार आहे. आज सामान्यतः प्रकृती उत्तम राहील. आजारी व्यक्तींना पण आराम वाटेल.

**वृश्चिक :** आज चंद्र मीन राशीत स्थित आहे. आपल्या राशीपासून चंद्र पाचव्या भावात असणार आहे. आजचा दिवस मध्यम फलदायी आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासात चांगली प्रगती करता येईल. नवीन कार्य शक्यतो आज सुरू करू नये.

**धनू :** आज चंद्र मीन राशीत स्थित आहे. आपल्या राशीपासून चंद्र चौथ्या भावात असणार आहे. आज मनात औदासिन्य दिसून येईल.

**मकर :** आज चंद्र मीन राशीत स्थित आहे. आपल्या राशीपासून चंद्र तिसऱ्या भावात असणार आहे. आजचा दिवस नवीन कार्य हाती घेण्यास अनुकूल आहे.

**कुंभ :** आज चंद्र मीन राशीत स्थित आहे. आपल्या राशीपासून चंद्र दुसऱ्या भावात असणार आहे. आज वाद-विवाद होण्याची शक्यता आहे. एखाद्या मांगलिक कार्यासाठी खर्च होईल.

**मीन :** आज चंद्र मीन राशीत स्थित आहे. आपल्या राशीपासून चंद्र प्रथम भावात असणार आहे. आजचा दिवस शुभ फलदायी आहे. उत्साह आणि स्वास्थ्य टिकून राहील.

# 'गुलाबी साडी' फेम गायक संजू राठोडने रचला इतिहास

गेल्या काही वर्षांत मराठी संगीत क्षेत्राने जागतिक स्तरावर मोठी ओळख मिळवली आहे, ज्यात अनेक प्रतिभावान कलाकारांचा मोठा वाटा आहे. असाच एक टॅलेंटेड गायक संजू राठोड (Sanju Rathod). संजूच्या 'गुलाबी साडी' आणि 'नऊवारी' गाण्यांना लाखो लोकांचा प्रतिसाद मिळाल्यामुळे मराठी संगीतक्षेत्रात त्याने एक विशिष्ट असं स्थान निर्माण केलं आहे. संजू राठोड आंतरराष्ट्रीय कलाकारासमवेत शो सुरू करणारा पहिला मराठी कलाकार ठरला असून, या खास क्षणामुळे मराठी संगीत क्षेत्रामध्ये एक नवा अध्याय लिहिला जाणार आहे.

म्युझिक कॉन्सर्टमध्ये, संजूने आपल्या सुपरहिट 'गुलाबी साडी' गाण्याने प्रेक्षकांना भारावून सोडलं. 'गुलाबी साडी' गाणं ५० मिलिअनपेक्षा अधिक वेळा Spotify वर सर्वाधिक ऐकलं गेलेलं मराठी गाणं आहे. त्यानंतर त्याचं नुकतंच रिलीज झालेलं 'काळी बिंदी' गाणं देखील सादर केलं, जे सध्या सर्व प्लॅटफॉर्म्सवर ट्रेंड होत असून युट्युबच्या इंडिया टॉप म्युझिक व्हिडिओ चार्टवर दिसत आहे. त्याच्या जोशपूर्ण परफॉर्मन्सने संपूर्ण प्रेक्षकांना उत्साहाने भारावून सोडलं. पारंपरिक महाराष्ट्रीय संगीताची खासियत आणि त्यात आधुनिक शैलीने गाणं तयार करण्याच्या त्याच्या या अनोख्या कौशल्यामुळे आतंरराष्ट्रीय डीजे स्टेजवर त्याची झालेली निवड ही योग्य होती.

ॲलन वॉकरच्या ग्लोबल इलेक्ट्रॉनिक साऊंडसोबत आपल्या महाराष्ट्राची समृद्ध संगीत कला सादर करण्यात आल्यामुळे इतर प्रादेशिक कलाकारांना नक्कीच एक नवी उमेद मिळाली असणार, हे नक्की. या संधीविषयी व्यक्त होताना संजू राठोड म्हणाला की, "ॲलन वॉकरसारख्या ग्लोबल आयकॉनसमोर परफॉर्म करण्याची संधी मिळणं ही माझ्यासाठी सन्मानाची गोष्ट होती आणि मराठी संगीताला आंतरराष्ट्रीय मंचावर सादर करण्याची ही एक मोठी संधी होती." चाहत्यांनी देखील कॉन्सर्टविषयी उत्साह व्यक्त केला आणि मनापासून आनंद घेतला.



# सण उत्सवानंतरही भाज्यांचे भाव कडाडले, गृहिणींचं बजेट बिघडलं

**नाशिक (सचिन कदम) :** जिल्ह्यात गेल्या पाच ते सहा महिन्यांपासून भाज्यांचे भाव कडाडले आहेत. सण उत्सवानंतर भाव कमी होतील, असा अंदाज होता. मात्र आवक वाढून सुद्धा भाव मात्र कमी होण्याचं नाव घेत नाहीत. त्यामुळे सर्वसामान्य गृहिणींचं बजेट बिघडलं आहे. सण उत्सवानंतरही भाज्यांचे भाव कडाडले : स्वयंपाक घरात रोज दोन वेळा लागणारी वस्तू म्हणजे भाजी, आज कोणती भाजी करावी, असा प्रश्न महिलांना पडतोय. मात्र गेल्या काही



महिन्यांपासून भाज्या इतक्या महागल्या आहेत, की जिथं रोज दोन भाज्या केल्या जात होत्या, तिथं आता एकच भाजी केली जाते. रात्रीची भाजी सहसा होतच नाही. त्याऐवजी अनेक ठिकाणी भाताच्या खिचडीला पसंती दिली जाते. बाजार समितीत भाज्यांची आवक वाढलीय, मात्र तरी देखील भाव कमी होण्याचं नाव घेत नाही. कांद्याचे दर मात्र गेल्या सहा महिन्यानंतर प्रथमच वाढले आहेत. २५ ते ३० रुपये किलोनं विक्री होणारा कांदा आता ८० ते ९० रुपये किलोनं विक्री होत आहे. नेहमीच नैसर्गिक आपत्तीमुळे संकटात सापडलेला कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या खिशात कांद्याचे दर वाढल्यानं दोन पैसे जास्तीचे जमा होत असल्यानं कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचं वातावरण आहे.

"मागील सहा महिन्यापासून आम्हाला मार्केट कमिटीमधून जास्त दरानं भाज्यांची खरेदी करावी लागत आहे. त्यामुळे दोन पैसे ठेवून आम्हालाही पुढं ग्राहकांना विक्री करावी लागत आहे. मात्र भाव जरी जास्त असले तरी बटाटे, कांदा, भेंडी आदींना मागणी जास्त आहे. पुढील काही दिवस भाज्यांचे भाव चढे राहतील," असं भाजी विक्रेत्यांनी सांगितलं.

"सणासुदीत भाज्यांचे भाव वाढले, गणपती, नवरात्र आणि आता दिवाळीनंतर सुद्धा भाजीपाल्यांसाठी जास्त पैसे मोजावे लागत आहेत. जिथे मी नेहमी एक किलो भाजी घेत होते, तिथे आता अर्धा किलो घेते. तसेच दिवसातून एक वेळा भाजी करते, तर रात्रीच्या जेवणात खिचडी बनवते," असं ग्राहक महिलेने सांगितलं.

# विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा उत्साहात संपन्न



**पंढरपूर (दिगंबर जाधव) :** कार्तिकी एकादशीनिमित्त श्रीक्षेत्र पंढरपूर येथे आज (१२ नोव्हेंबर) श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार आणि त्यांच्या पत्नी सायली पुलकुंडवर तसंच मानाचे वारकरी यांच्या हस्ते पार पडली. विठ्ठल-रुक्मिणीच्या या महापूजेत यंदा लातूर जिल्ह्यातील उदगीर येथील भाविक दाम्पत्य बाबुराव सगर आणि सागरबाई सगर मानाचे वारकरी ठरले.

शासकीय महापूजेदरम्यान उपस्थित राहणाऱ्या मानाच्या वारकरी निवडीसाठी दर्शन रांगेतून भाविकांची निवड करण्यात आली. मानाचे वारकरी ठरलेले सगर दापत्य हे गवंडी काम करून आपला उदरनिर्वाह करतात. दोन मुलं, दोन मुली आणि नातवंडं असं त्यांचं कुटुंब असून गेल्या १४ वर्षांपासून ते नियमितपणे वारी करत आहेत. दरम्यान, मानाचा वारकरी निवड करण्याची प्रक्रिया व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखाधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख पृथ्वीराज राऊत, राजाराम ढगे यांनी पार पाडली.

कार्तिकी एकादशीनिमित्त शासकीय महापूजा नेहमी उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते सपत्नीक पार पडते. परंतु, विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यात आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. त्यामुळं यंदा विठुरायाची शासकीय महापूजा पुणे विभागीय आयुक्त डॉक्टर चंद्रकांत कुलकुंडवार यांच्या हस्ते पार पडली. शासकीय महापूजेपूर्वी मंदिर समिती मार्फत होणारी श्री विठ्ठल-रुक्मिणीची पाद्यपुजा आणि नित्यपुजा अनुक्रमे मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके आणि व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते संपन्न झाली.

SPORT


# THIS 17-year-old Mumbai batter impressed MS Dhoni, CSK want his Ruturaj Gaikwad's opening partner in IPL 2025

Chennai Super Kings (CSK), the five-time IPL champions, are reportedly eyeing Mumbai's 17-year-old opener Ayush Mhatre for the upcoming IPL 2025 mega auction.

Mhatre has been invited for a selection trial with CSK, where he reportedly impressed legendary captain Mahendra Singh Dhoni. With the fifth round of the Ranji Trophy concluding on November 16, CSK will have an eight-day window to assess Mhatre if he attends the trial.

According to The Times of India, Ayush Mhatre has not only impressed CSK's talent scouts but also MS Dhoni





himself. Consequently, CSK has invited Mhatre for a trial between the end of the fifth round of the Ranji Trophy on November 16 and the start of the Syed Mushtaq Ali Trophy, utilizing the six-day gap between the two tournaments.

This trial period provides CSK with ample time to assess Mhatre's skills ahead of the IPL 2025 mega auction scheduled for November 24 and 25.

Mhatre recently made his first-class debut for Mumbai in the Irani Cup against Rest of India, where he opened the batting with Prithvi Shaw, scoring 19 and 14 runs in his two innings.

Mhatre's numbers for Mumbai so far are solid but not extraordinary. In five matches, he has scored 321 runs at an average of 35.66, including one century and one half-century. His standout performance came with a remarkable 176 against Maharashtra.

The report mentions that CSK Managing Director and CEO, Kasi Viswanathan, has requested the Mumbai Cricket Association (MCA) to permit Mhatre to attend a trial at the CSKHPC Navalur grounds.

CSK will enter the IPL 2025 mega auction with a purse of Rs 55 crore, having retained key players such as Ruturaj Gaikwad, Ravindra Jadeja, Matheesha Pathirana, Shivam Dube, and MS Dhoni. If they opt to buy Ayush Mhatre, the young batter could potentially serve as an opening partner for Gaikwad at the top of the order.

# "Security Concerns Higher With India": Pakistan Great Slams Own Board For 'Court Threat' Over Champions Trophy

**New Delhi -** Former Pakistan spinner Danish Kaneria questioned the Pakistan Cricket Board (PCB) by asking what will they achieve by going to the Court of Arbitration for Sport (CAS) after India refused to travel for next year's Champions Trophy.

As per the media reports, the PCB is exploring an option of approaching the CAS on the matter as they remain adamant about hosting the full tournament in Pakistan.

Kaneria said it was almost evident that India would not travel to Pakistan because of security concerns and political reasons, adding that nothing will be achieved by going to CAS.

"The issue was ongoing for



long that India will not travel to Pakistan for political and other reasons. They have an option of the hybrid model as they did in the Asia Cup but things should be settled as Pakistan travelled to India for ODI World Cup last year. If Pakistan go to the international court (CAS) what will they achieve out of it? There's the uncertainty of security in Pakistan. International teams are coming but security concerns are much higher with the Indian team," Kaneria, who 261 Test wickets are the highest by a spinner from the country, told IANS.

The former spinner suggested a 'hybrid model' like Asia Cup for the tournament, with India playing their matches in Dubai while the rest of the event continues to be hosted in Pakistan.

"Looking at the big picture, India should play their matches in Dubai and Pakistan continue to host the Champions Trophy in the country. Things will only go downhill in this situation but Pakistan have nothing to lose as they did the same last time and also sent their team to India for World Cup. PCB is adamant this time and says many fans in Pakistan want to see Virat Kohli, Rohit Sharma, Jasprit Bumrah and Ravindra Jadeja play in Pakistan," the former cricketer said.

"It will interesting to see how PCB will move ahead with the Champions Trophy from here; will they play on the front foot and stay bold in their stand? I think things should be done swiftly with delegations of both boards interacting in person to find the desirable outcome," Kaneria concluded.

The Champions Trophy, a marquee event set to make its return in 2025 after eight years, is expected to feature the world's top eight cricketing teams, with Pakistan securing the hosting rights.

# Mohammed Shami set for domestic cricket return against MP in Ranji Trophy



**Kolkata :** Mohammed Shami is finally set to return to competitive cricket, with Bengal naming the fast bowler in the squad for the Ranji Trophy Elite Group C match against Madhya Pradesh in Indore starting Wednesday.

Shami, who has been out of competitive action since India's ODI World Cup final in Ahmedabad last November, was hoping to be picked for the tour of Australia on the basis of his domestic performance but his recovery from surgery due to an Achilles tendon injury was longer than anticipated. He was at the NCA for the better part of last year.

With their hopes of picking Shami for Australia going down the drain, the senior selectors finally went with Jasprit Bumrah, Mohammed Siraj, Akash Deep, Prasidh Krishna and Harshit Rana in the squad, with Mukesh Kumar, Khaleej Ahmed and Navdeep Saini as travelling reserves.

# "Just wait and watch"- Rohit Sharma-Virat Kohli threat issued by Indian Cricket's Destroyer

**New Delhi -** Former national selector Chetan Sharma has backed the experienced duo of Rohit Sharma and Virat Kohli to shine in the Border-Gavaskar Trophy 2024-25. Sharma even claimed that players like Rohit and Kohli are never out of form.

Rohit Sharma and Virat Kohli had endured a tough home season recently where they struggled against both Bangladesh and New Zealand. In the recent series against New Zealand, Rohit scored just 91 runs in three Tests at an average of 15.16. Meanwhile, Kohli scored just 93 runs at an average of 15.50.

The poor returns of these two batters were one of the main reasons for India's embarrassing 0-3 series defeat to New Zealand. Both the batters will now go to Australia for a five-match Test series where they will be expected to return to form.

During an interview with TimesofIndia.com, Chetan Sharma spoke about India's chances in the Border-Gavaskar Trophy 2024-25. While he backed India to win the series, he also



spoke about the form of Rohit Sharma and Virat Kohli.

Sharma claimed that players like Rohit and Kohli are never out of form and they are always in focus because of their stature. He backed both the batters to return to form and dazzle in Australia.

"Let's honor and respect what Rohit and Virat have done for the country. Players like Rohit and Virat are never out of form. They are never in a lean or bad patch. These words shouldn't be used for them. We are thankful to them. They are still doing it," Sharma said.

"We always talk about them and focus on them and want them to shine every time because they are superstars. Just wait and watch what Rohit and Virat do in Australia. They will dazzle with their bats," he added.

Rohit Sharma and Virat Kohli have been touring Australia for a decade now. While Rohit has a mediocre record on Australian soil with 408 runs in 7 Tests at an average of 31.38, Kohli has excellent numbers with 1352 runs in 13 Tests at an average of 54.08.

Both of them will be under pressure to perform in the upcoming Test series as it can also decide their future in Test cricket. Over the years, they have come up on top after various failures and can be expected to trump this situation as well.

मालवण शिवपुतळा दुर्घटना प्रकरण

# जामिनासाठी शिल्पकार आपटेची उच्च न्यायालयात धाव



● मुंबई, राकेश गायकवाड :

मालवण शिवपुतळा दुर्घटना प्रकरणी शिल्पकार जयदीप आपटे याने जामिनासाठी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे शिवाजी महाराजांचा कांस्य पुतळा कोसळल्याचा दावा आपटे याने जामिनाची मागणी करताना केला आहे.

यापूर्वी आपण नौदलासाठी कांस्य पुतळ्यांचे काम केले आहे. परंतु, नौदलाकडून आपल्या कामाबाबत कधीच तक्रार केली गेली नाही. याउलट, धातू शास्त्रांतील तांत्रिक कौशल्याबाबत काहीच माहीत नसलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (पीडब्ल्यूडी) अधिकाऱ्यांनी दुर्घटनेच्या नऊ तासांच्या आतच या प्रकरणी तक्रार नोंदवल्याचा दावा आपटे याने याचिकेत केला आहे. शिवाय, पुतळा कोसळल्यामुळे कोणीही जखमी झाल्याचे तक्रारीत नमूद नाही. त्यामुळे, हे प्रकरण निष्काळजीपणाचे असू शकते, असा दावाही आपटे याने याचिकेत केला आहे. हा पुतळा अनेक शतके टिकेल आणि सुस्थितीत राहील हे लक्षात घेऊन खबरदारीचे सर्व उपाय केल्याचा दावा देखील आपटे यांनी जामिनाची मागणी करताना केला आहे.

सिंधुदुर्ग न्यायालयाने जामीन देण्यास नकार दिल्यानंतर जामिनाच्या मागणीसाठी आपटे याने वकील गणेश सोवनी यांच्यामार्फत उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. न्यायमूर्ती अनिल किलोर यांच्या एकलपीठासमोर आपटे याच्या याचिकेची सुनावणी होणार आहे. दरम्यान, गेल्यावर्षी ४ डिसेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मालवणमधील राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या २८ फुटांच्या पुतळ्याचे उद्घाटन करण्यात आले होते. दोन कोटी ४४ लाख रुपये खर्चून हा पुतळा उभारण्यात आला होता. मात्र, २६ ऑगस्ट रोजी हा पुतळा अचानक कोसळला. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (पीडब्ल्यूडी) अधिकाऱ्यांनी स्थानिक पोलिसांकडे या प्रकरणी केलेल्या तक्रारीनंतर आपटे याच्यावर भारतीय न्याय संहिता आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक कायद्याच्या विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेनंतर, सुरुवातीला आपटे फरारी होता. नंतर तो पोलिसांना शरण आला.

# रत्नागिरीत १३ घुसखोर बांगलादेशींना अटक

● रत्नागिरी, आकांक्षा नार्वेकर :

चिरेखाणीवर अवैधरीत्या राहणाऱ्या १३ बांगलादेशी नागरिकांना रत्नागिरी दहशतवाद विरोधी शाखेने पकडल्याने एकच खळबळ उडाली आहे. रत्नागिरी तालुक्यातील नाखरे येथील कालरकोंडवाडी येथे आज, मंगळवारी पहाटेच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली.

वहीद रियाज सरदार (३५, रा. तहसील कलारोवा, जि. सातखिरा, कलारोवा), रिजाऊल हुसेन करीकर (५०, रा. तहसील सागरदरी, जि. जेसोर), शरीफुल हौजीआर सरदार (२८, रा. तहसील कलारोवा, जि. सातखिरा), फारुख महंमद जहीरअली मुल्ला (५०, रा. तहसील कैबा, जि. जसोर), हमीद मुस्तफा मुल्ला (४५, रा. तहसील कलारोवा, जि. सातखिरा), राजू अहमद हजरतअली शेख (३१, रा. तहसील सागरदरी, जि. जेसोर), बाकीबिल्लाह अमीर हुसेन सरदार (२९, रा. तहसील कलारोवा, जि. सान कलारोवा), सैदूर रेहमान मोबारक अली (३४, रा. पसल कलारोवा, जि. सातखिरा), आलमगीर हुसेन हिरा सन ऑफ अब्दुल कादर दलाल (३४, रा. पाईकपरा, पो. कामाराली, जि. साथखिरा), मोहम्मद शाहेन सरदार सन ऑफ समद सरदार (३२, रा. बोरुदाबाक्शा, जि. सातखिरा), मोहम्मद नुरुझमान मोरोल सन ऑफ बलायत अली (३८, रा. बाशबरी, जि. जसोर), मोहम्मद नुरहसन सरदार सन ऑफ मोहम्मद जहर सरदार (४५, रा. बराली, जि. सातखिरा), मोहम्मद लालटू मोंडल, सन ऑफ किताब अली (३७, रा. बराली, जि. सातखिरा), अशी अटक केलेल्या नागरिकांची नावे आहेत.

पोलिस अधीक्षक धनंजय कुलकर्णी, अतिरिक्त पोलिस अधीक्षक जयश्री गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली दहशतवादविरोधी शाखेतील सहायक पोलिस निरीक्षक दत्तात्रय कदम, पोलिस अंमलदार उदय चांदणे, महेश गुरव, रत्नाकांत शिंदे, विजय कदम यांनी ही कामगिरी केली आहे.

# आता ओपिनियन आणि एक्झिट पोलला प्रतिबंध !

● कोल्हापूर, प्रथमेश चव्हाण :

भारत निवडणूक आयोगामार्फत महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर आयोगाने उद्यापासून २० तारखेला सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत निकालांचे अंदाज (ओपिनियन पोल तसेच एक्झिट पोल) दर्शविण्यावर प्रतिबंध केला आहे.

भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने १५ ऑक्टोबर २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील दहा विधानसभा मतदारसंघात दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. या अनुषंगाने निवडणूक निकालांचे अंदाज १३ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी सात वाजेपासून ते २० नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी ६.३० वाजेपर्यंतच्या कालावधीत कोणत्याही प्रकारच्या एक्झिट पोलचे आयोजन करणे, कोणत्याही माध्यमांद्वारे प्रकाशन अथवा प्रसारण करण्यास प्रतिबंध लागू राहणार आहे.

त्याचप्रमाणे मतदान संपण्याच्या आधी ४८ तासाच्या कालावधीत निवडणूक निकालांचे अंदाज (ओपिनियन पोल) अथवा अन्य मतदान सर्वेक्षणाच्या परिणामांच्या प्रकाशन अथवा प्रसारणावर प्रतिबंध असेल, असेही निवडणूक आयोगाने अधिसूचनेद्वारे स्पष्ट केले आहे.

# शेतकऱ्यांनो, रब्बीची पेरणी केली; आता १ रुपयात पिकांना द्या विमा कवच, अर्ज प्रक्रिया सुरू

● छत्रपती संभाजीनगर, सचिन कदम :

खरीपप्रमाणेच रब्बी हंगामातही केवळ एक रुपयात पीक विमा भरता येणार आहे. नैसर्गिक आपत्तीत पिकांना विमा संरक्षण मिळावे, यासाठी रब्बी हंगामात गहू, हरभरा पिकांची पेरणी केली असल्यास अशा शेतकऱ्यांनी मुदतीत विमा भरणे आवश्यक आहे.

राज्य शासनाने जून २०२३ मध्ये सर्वसमावेशक पीकविमा योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. रब्बी हंगामातही प्रतिअर्ज एक रुपयात पीकविमा योजनेत शेतकऱ्यांना सहभागी होता येणार आहे. नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगामुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण मिळणार आहे. कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिकतेप्रमाणे योजनेत सहभागी होता येईल. पीकविमा योजना अधिसूचित पिकांसाठी केवळ



अधिसूचित क्षेत्रासाठी लागू राहणार आहे. तालुक्यात रब्बी गहू बागायती, हरभरा, रब्बी कांदा, ज्वारी ही पिके अधिसूचित करण्यात आली आहेत. रब्बी हंगामासाठी पीकविमा योजनेत सहभागी होण्यासाठी कांदा, गहू, हरभऱ्याची लागवड केलेल्या शेतकऱ्यांना नोंदणीसाठी १५ डिसेंबरची, तर ज्वारीची पेरणी करणाऱ्या शेतकऱ्यांना ३० नोव्हेंबर ही अंतिम मुदत देण्यात आली आहे. मुदतीपूर्वी शेतकऱ्यांनी विमा योजनेत सहभागी व्हावे, यासाठी कृषी विभागाकडून गावस्तरावर जनजागृती केली जात आहे.

### ऑनलाइनही भरता येईल अर्ज

पीकविमा योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांना सहजपणे अर्ज करता यावा, यासाठी ऑनलाइन अर्ज करण्याचीदेखील सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. pmfby पोर्टल तसेच https//pmfby.gov.in या संकेतस्थळावर स्वतः तसेच बँक, विमा कंपनी प्रतिनिधी व सामूहिक सेवा केंद्रामार्फत अर्ज करता येतो.

### अर्ज प्रक्रिया सुरू

खरीप हंगामाच्या तुलनेत रब्बी हंगामात पीकविमा भरणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या कमी असते. रब्बीचे क्षेत्र कमी असल्यानेच पीकविमा योजनेत सहभागी शेतकरीही कमी असतात. गतवर्षी रब्बी हंगामातील गहू, हरभरा पिकांचे मोठे नुकसान झाले होते. नैसर्गिक आपत्तीचे काही सांगता येत नसल्याने हंगामातील पिकांना विमा संरक्षण देणे आवश्यक असते.

# त्र्यंबकेश्वर येथे जाणाऱ्या चौघा साधूंना मारहाण; संगमनेर शहरातील घटना

● संगमनेर, नितीन देवळेकर :

त्र्यंबकेश्वर येथे जाणाऱ्या चौघा साधूंना बेदम मारहाण करण्यात आली. ही घटना सोमवारी दुपारी साडेचार वाजेच्या सुमारास नवीन नगर रस्त्यावरील कुटे हॉस्पिटलजवळ घडली. मारहाण झालेल्या चारही साधूंवर घुलेवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांनी त्यांचे जबाब नोंदविले असून, गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

■ मारहाण करणाऱ्यांचा पोलिस शोध घेत असून, त्यांच्यावर कायदेशीररीत्या कारवाई होणार आहे. अफवांवर विश्वास ठेवू नये, कुणीही तणावाची परिस्थिती निर्माण करू नये.

**- डॉ. कुणाल सोनवणे, उपविभागीय पोलिस अधिकारी**

मारहाण झालेल्या साधूंपैकी एकाने सांगितले की, आम्ही त्र्यंबकेश्वर (जि. नाशिक) येथे जात होतो. चहा घेण्यासाठी उतरलो. तो घेऊन निघालो होतो. त्यावेळी काही जण आम्हाला आडवे झाले. तुम्ही इकडे कसे काय आले, असे म्हणत त्यांनी मारहाण करायला सुरुवात केली. चार-पाच जणांनी मारहाण केली. लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यांनी आम्हा सर्वांना बेदम मारहाण केली. मारहाण करणारे हिंदीत बोलत होते. एप्रिल २०२० मध्ये पालघर जिल्ह्यांत दोन साधूंची मारहाण करून हत्या करण्यात आली होती.

# पतीचा पत्नी, मेहुणी, सासऱ्यावर कुऱ्हाडीने हल्ला

● नागपूर, सुचिता देशमुख :

वस्तीत राहणाऱ्या तरुणीवर प्रेम जडल्यानंतर युवकाने तिच्याशी प्रेमविवाह करण्यासाठी खूप आटापीटा केला. तो बेरोजगार असल्यामुळे तरुणीच्या वडिलांनी मुलीच्या प्रेमविवाहास विरोध केला. मात्र, कुटुंबीयांच्या विरोधाला न जुमानता 'प्रेमासाठी वाट्टेल ते' म्हणत प्रेयसीला पळवून नेले आणि प्रेमविवाह केला. मात्र, चार वर्षानंतरच पत्नीचे शेजारी राहणाऱ्या युवकाशी अनैतिक संबंध आहेत, असा संशय पतीला आला. त्या संशयातून वाद वाढत गेले आणि विपरित घडले.

ही थरारक घटना मानकापुरात घडली. मलिका विवेक तांडेकर (२४, रा. झिंगाबाई टाकली, मानकापूर), मूलचंद रतिराम वासनिक (५२, रा. झिंगाबाई टाकली) आणि प्रतीक्षा मुलचंद वासनिक अशी जखमींची नावे आहेत.

आरोपी विवेक इशूलाल तांडेकर (२६) हा झिंगाबाई टाकळी, मानकापूर परीसरात राहतो. त्याचे मंडप-बिछायत केंद्र आहे. त्याच वस्तीत मलिका हीसुद्धा राहत होती. गेल्या पाच वर्षांपूर्वी दोघांचे प्रेमसंबंध जुळले. त्यांनी कुटुंबियांच्या विरोधात जाऊन प्रेमविवाह केला. त्यांना आता तीन वर्षांचा मुलगा आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून विवेक हा पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिचे कुण्यातरी युवकाशी अनैतिक संबंध असल्याचा आळ घेत होता. यातून त्यांच्यात अनेकदा वाद होत होते. दिवाळीदरम्यान विवेक आणि मलिका यांच्यात वाद झाला आणि ती थेट मुलाला घेऊन माहेरी आली. विवेकला पत्नी आणि मुलाला घरी न्यायचे होते. त्यामुळे तो सोमवारी रात्री दहा वाजता सासरी आला. त्याने पत्नीला घरी जाण्यासाठी तयारी करण्यास सांगितले. मात्र, मलिकाने त्याला नकार दिला. दरम्यान, मेहुणी प्रतीक्षा आणि सासरे मुलचंद वासनिक यांनी विवेकला घराबाहेर जाण्यास सांगितले. त्यामुळे विवेकने त्यांना मारहाण करीत जीवे मारण्याची धमकी दिली.

# नोकऱ्यांच्या बाजारात गर्दी; सरकारची कडक भूमिका स्वागतार्ह

● गोवा, दिगंबर जाधव :

'दुनिया झुकती है, झुकाने वाला चाहिए' हा डायलॉग विविध संदर्भात वापरण्यात येतो. गोव्यात मात्र सध्या काही महिला व पुरुष एजंटांनी दिवसाढवळ्या अनेकांना झुकवले आहे. साऱ्या पोलिस यंत्रणेसमोर त्यांनी आव्हान उभे केले आहे. सरकारमध्येही खळबळ उडवून दिली आहे. गोव्यात सरकारी नोकऱ्यांचा बाजार कसा मांडला गेला होता व हा बाजार दिमाखात कसा सुरू होता, हे आता अधिकृतरीत्या सर्वांना कळून आले आहे. आमच्याकडे सर्व काही स्वच्छ व पारदर्शकच चालते, असे दावे ज्यांच्याकडून केले जातात, त्या राजकीय व्यवस्थेने आता अधिक न बोललेले बरे. अर्थात याबाबत कोणत्याही एका पक्षाच्या सरकारला दोष द्यावा, अशी स्थिती नाही. दरवेळी हे घडत आले आहे. आता निदान ते उघड तरी झाले व सरकारनेही कडक भूमिका घेतली, हे स्वागतार्ह आहे.

नोकऱ्यांचा लिलाव किंवा बाजार यापुढील काळात तरी बंद होईल का, हे मात्र पाहावे लागेल. गोव्यात काही एजंट व उपएजंटांनी सरकारी नोकऱ्या मिळवून देतो, असे सांगून कोट्यवधी रुपये उकळले. एखाद्या महाठकसेनाने सर्वांना हातोहात फसवावे तसे एजंटांनी गोमंतकीयांना फसविले. काही महिला व पुरुष एजंटांसमोर अनेक कुटुंबे झुकली. ज्या पदांच्या जाहिराती देखील आल्या नव्हत्या, त्या पदांसाठीदेखील आपली वर्णी लागावी म्हणून अगोदरच अनेकजण एजंटांना



पैसे देऊन मोकळे झाले. काही एजंटांनी राजकारण्यांची नावे वापरली. काही राजकारणी अशा व्यवहारांत माहिर असल्याने एजंटांवर लोकांचा विश्वास बसला असावा. मात्र, हे सगळे प्रकरण गोवा सरकारच्या नोकर भरती प्रक्रियेला एवढी वर्षे वाळवी लागली होती, हे दाखवून देणारे ठरले आहे. पूर्वी अभियंत्यांची पदे भरणे असो किंवा आरटीओ पदे भरणे असो; कोणते पराक्रम सरकारी पातळीवरून केले जायचे हे लोकांना ठाऊक आहे. दीपक प्रभू पाऊसकर 'साबांखा' मंत्री असताना भाजपच्याच आमदारांनी आरोप केले होते. पुढे नीलेश काब्राल त्या खात्याचे मंत्री झाल्यानंतरही नोकरभरती हाच वादाचा मुद्दा बनला होता. एकंदरीत सगळा बाजार पूर्वीपासूनचाच आहे. आता बाजारात एजंटांची व ग्राहकांची गर्दी जास्त वाढल्याने स्फोट झाला.

लोक कर्ज काढून किंवा दागिने विकून लाखो रुपये गोळा करतात आणि नोकरीच्या आशेपोटी एजंटांच्या हाती देतात. हे एजंट मग वर्ष-दोन वर्षे युवा-युवतींच्या स्वप्नांशी खेळत राहतात. नोकरी मिळेल, या अपेक्षेने लोक सगळे सहन करतात. फसवणूक झाल्यानंतरही पूर्वी पोलिसांत तक्रारी येत नव्हत्या. मुख्यमंत्र्यांनी आक्रमक भूमिका घेतल्याने निदान लोक तक्रारी घेऊन पुढे तरी आले. शिक्षक, मुख्याध्यापक, पोलिस वगैरे अनेकांनी वाहत्या गंगेत हात धुऊन घेतले होते, हे उघड झाले. अनेकजण एजंट बनले होते. यात राजकीय पक्षांचे कार्यकर्तेही आलेच.

# दिवाळी, छठ पूजा उत्सवानिमित्त मध्य रेल्वेच्या विविध स्थळांसाठी एकूण ७४० विशेष ट्रेन सेवा

● मुंबई, विशाल पाटील :

दिवाळी, छठ पूजा उत्सवाच्या निमित्ताने गर्दी लक्षात घेऊन आरामदायी प्रवास करता यावा यासाठी मध्य रेल्वेने प्रवाशांसाठी एकूण ७४० विशेष ट्रेन सेवा चालवत आहेत. ५०७ स्पेशल ट्रेन्सची घोषणा करण्यात आली आहे ज्या या ७४० स्पेशल ट्रेनच्या सेवा पूर्ण करतील, त्यापैकी २३३ सेवा आधीच पूर्ण केल्या गेल्या आहेत.

या गाड्यांमध्ये वातानुकूलित विशेष, वातानुकूलित, शयनयान आणि जनरल डब्यांच्या मिश्र संयोजन असलेल्या गाड्या आणि अनारक्षित विशेष गाड्यांचा समावेश आहे. दिवाळी, छठ पूजा सणासाठी, मुंबई, पुणे, नागपूर इ. येथून देशभरातील विविध स्थळांसाठी विशेष गाड्या चालवल्या जात आहेत.

मुंबईतून एकूण ३६३ सेवांची घोषणा करण्यात आली असून त्यापैकी २५२ सेवा पूर्ण झाल्या असून आणखी १११ सेवा चालवण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे पुण्यातून ३२७ सेवा जाहीर केल्या आहेत त्यापैकी २२१ सेवा चालल्या आहेत तर आणखी १०६ सेवा चालवल्या जातील आणि नागपूर, लातूर, दौंड इत्यादी ठिकाणांहून ५० सेवा जाहीर केल्या आहेत त्यापैकी ३४ चालल्या आहेत आणि आणखी १६ सेवा चालवणार आहेत. महाराष्ट्रातील लातूर, सावंतवाडी रोड, नागपूर, पुणे, कोल्हापूर, नांदेड आणि इतर ठिकाणी प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी मध्य रेल्वेने १२५ सेवा जाहीर केल्या आहेत, त्यापैकी १०७ सेवा पूर्ण झाल्या आहेत आणि आणखी १८ सेवा चालवल्या जाणार आहेत.

उत्तरेकडे जाणाऱ्या प्रवाशांसाठी मध्य रेल्वेने दानापूर, गोरखपूर, छपरा, बनारस, समस्तीपूर, आसनसोल, आगरतळा, संत्रागाछी आणि इतर ठिकाणी ५५१ सेवा जाहीर केल्या आहेत ज्यातील ३५६ सेवा पूर्ण झाल्या आहेत आणि आणखी १९५ सेवा चालवल्या जातील. दक्षिणेकडे जाणाऱ्या प्रवाशांसाठी मध्य रेल्वेने करीमनगर, कोचुवेली, काझीपेट, बेंगळुरू आणि इतर



गंतव्यस्थानांसारख्या विविध ठिकाणी ६४ सेवा जाहीर केल्या आहेत ज्यापैकी ४४ सेवा पूर्ण झाल्या आहेत आणि आणखी २० सेवा चालवल्या जातील. या फेस्टिव्हल स्पेशल ट्रेन्स प्रवाशांना त्यांच्या प्रवासाचे नियोजन करण्यासाठी उपयुक्त ठरतील जेणेकरून त्यांच्या गंतव्यस्थानी आधीच पोहोचता येईल आणि त्यांच्या जवळच्या आणि प्रियजनांसोबत दिवाळी, छठ सण साजरे करता येतील.

प्रवाशांची सोय आणि सुविधा सुनिश्चित करण्यासाठी, मध्य रेल्वेने प्रवासी सुविधा वाढवल्या आहेत आणि आपल्या नेटवर्कवर अनेक उपाय लागू केले आहेत. महत्त्वाच्या स्थानकांवर प्रवाशांना मार्गदर्शन आणि मदत करण्यासाठी 'मे आय हेल्प यू' बूथ प्रदान केले आहेत. प्रवाशांच्या सोयीसाठी विविध स्थानकांवर तिकीट काउंटरची संख्या वाढवली आहे. प्रमुख स्थानकांवर प्रवाशांना थांबवण्यासाठी होल्डिंग क्षेत्रे तयार केली आहेत. विविध स्वयंसेवी संस्थांच्या सहाय्याने सर्व प्रवाशांना स्थानक परिसरात नियोजित होल्डिंग एरियामध्ये मोफत पिण्याचे पाणी, भोजन आणि शौचालयाची सुविधा पुरवली जात आहे.

अतिरिक्त आरपीएफ कर्मचारी आणि तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांची तैनाती करून विशेष गाड्यांमध्ये योग्य बोर्डिंग सुनिश्चित करण्यासाठी रेल्वेने पद्धतशीर रांग व्यवस्थापन प्रणाली देखील ठेवली आहे. सर्व स्थानकांवर रेल्वे संरक्षण दल (RPF) आणि तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांची दृश्यमान उपस्थिती प्रवाशांची सुरक्षा आणि सुरक्षा राखण्यासाठी देखील उपयुक्त आहे. हे कर्मचारी प्रवाशांना त्यांच्या नियुक्त प्लॅटफॉर्मवर निर्देशित करण्यात, सुरक्षा प्रोटोकॉलचे काटेकोर पालन सुनिश्चित करण्यात आणि स्टेशन परिसरात गर्दीच्या हालचाली प्रभावीपणे व्यवस्थापित करण्यात मदत करत आहेत. शेवटच्या क्षणी होणारी गैरसोय टाळण्यासाठी प्रवाशांना स्टेशनवर वेळेवर पोहोचण्याचा सल्ला दिला जातो. वेळेवर येण्यामुळे बोर्डिंगची प्रक्रिया सुरळीत आणि प्रवासाचा अधिक आरामदायी अनुभव मिळण्यास मदत होईल.

या विशेष गाड्यांच्या तपशीलवार वेळा आणि थांब्यांसाठी, कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा NTES ॲप डाउनलोड करा. मध्य रेल्वेने प्रवाशांना गैरसोय टाळण्यासाठी वैध तिकीट आणि ओळखपत्र घेऊन प्रवास करण्याचे आवाहन केले आहे. प्रवाशांनी आमच्या सेवा निवडण्यात त्यांचा विश्वास आणि पाठिंबा दिल्याबद्दल मध्य रेल्वे प्रशासन त्यांचे आभार व्यक्त करते. आमच्या सर्व आदरणीय प्रवाशांना सुरक्षित, आरामदायी आणि सोयीस्कर प्रवास अनुभव देण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत.